**उपसंहार** -

यावरुन स्पष्ट हेते की कर्नाटक प्रांतीय जैन कवींनी फार प्राचीन कालापासूनच साहित्य परंपरेची जोपासना केली आहे आणि साहित्याच्या माध्यमाने जगाच्या विविध अंगाची सेवा केली आहे. पुष्कळसे साहित्य नष्ट भ्रष्ट झाले, विकृत झाले. उरलेले साहित्यही अल्प प्रमाणात नाही. कोणत्याही समाजास अभिमान वाटावा आणि साहित्यिक समाजाने आदराने स्मरण करावे या प्रमाणात आज कर्नाटक जैन साहित्य उपलब्ध आहे. ही परंपरा कर्नाटक जैन कवींनी निर्माण करुन जैन समाजावर फार मोठे उपकार केले आहेत. या परंपरेची जपणूक पुढे होणे अत्यावश्यक आहे.

**जैन व्याकरण**

व्याकरण शब्दाची व्युत्पत्ति 'व्याक्रियन्ते व्युत्पाद्यन्ते शब्दाः अनेन' अशी आहे. व्याकरण हा शब्द वि+आ उपसर्गपूर्वक 'कृ' धातूला ल्युट प्रत्यय लागून बनलेला आहे. 'ज्यायोगे शब्द बनतात त्याला व्याकरण म्हणतात.' ते एक शास्त्र आहे. म्हणूनच व्याकरणाला शब्दशास्त्र असेही म्हटले जाते. व्याकरण छंद व कोष ही साहित्याची आनुषंगिक शास्त्रे आहेत. जैन परंपरेत अशा शास्त्रासंबंधीचे अनेक महत्वाचे ग्रंथ आहेत.

महर्षि पंतजलीने आपल्य महाभाष्यामध्ये असा प्रश्न निर्माण केला आहे की जर लोक प्रचलित भाषेचे ज्ञान लोकापासून आपोआप प्राप्त होते तर त्यासाठी शब्दानुशासन लिहिण्याची गरजच काय ? तथापि याच प्रश्नाच्या उत्तरात म्हटल्याप्रमाणे श्ब्दानुशसनाशिवाय शब्द व अपशब्द यातील भेद स्पष्ट होत नाहीत. त्यामुळेच शब्दानुशासन शास्त्राची गरज आहे. जैन साहित्याची निर्मिती पहिल्यापासूनच लोकभाषेत झाली आहे. त्यामुळेच दीर्घकाळपर्यंत व्याकरणशास्त्राची गरज न वाटणे स्वाभाविक आहे. लोकामध्ये प्रचलित असलेले वचनप्रयोगच साहित्यात येत, पुढे साहित्याची मोठया प्रमाणात निर्मिती होऊ लागली व निरनिराळया देशामध्ये प्रचलित असलेले निरनिराळे शब्दप्रयोग साहित्यात येऊ लागले व कालक्रमानुसार या वचनप्रयोगात फरक पडू लागल्याने व्याकरणशास्त्राची आवश्यकता भासू लागली.

आजपर्यंत उपलब्ध असलेल्या प्राकृत व्याकरणामध्ये चंडकृत 'प्राकृत लक्षण' सर्वात प्राचीन व्याकरण विषयक ग्रंथ होय. रॉडॉल्फ हार्नले यांनी याचे संपादन करुन ते बिबलिओथिका इंडियामध्ये इ. स. १८८० मध्ये प्रसिध्द केले. हा एका जैनाचा आहे असे त्याने सिध्द केले आहे तरी पण, काही लोकांनी ही सुत्रे वाल्मीकीकृत मानली आहेत पण हे असंभवनीय आहे. कारण ग्रंथाच्या आरंभी ग्रंथकाराने वीर तीर्थकारांना

प्रणाम केला आहे. शिवाय पद्यातील उदाहरणामध्ये अर्हत् (सू. ४६ व २४), जिनवर (सू. ४८) या शब्दांचा उल्लेख आहे. यावरुन नि:संशयपणे ही रचना जैनांची ठरते. ग्रंथाचे सूत्रकार व वृत्तिकार निरनिराळे आहेत असे मानण्यासही काही कारण नाही. मंगलाचरणामध्ये प्राकृत व्याकरणाची निर्मिती वृध्दमताच्या आश्रयाने केली असल्याची सूचना आहे. यावरुन वृत्तिकार व सूत्रकार वेगवेगळे आहेत हा अभिप्रायही निराधार वाटतो. या ग्रंथाच्या लेखनकाली सूत्रकारासमोर एखादा प्राकृत व्याकरण ग्रंथ किंवा व्याकरणात्मक मतमतांतर उपस्थित करणारे साहित्य उपलब्ध असावे. त्यातूनच लेखकाने आपल्या ग्रंथामध्ये प्राचीनतम+विधि+प्रणालीचे रक्षण करण्याच प्रयत्न केला आहे.

'प्राकृत-लक्षण' ग्रंथाच्या लेखनकालासंबंधी जरी कोणतेही प्रत्यक्ष प्रमाण मिळत नसले तरी ग्रंथाच्या अंतर्भागातील विविध उल्लेखांच्या परीक्षणावरुन काळासंबंधी काही निर्णय तयार करणे शक्य आहे. या ग्रंथाची एकूण सूत्रसंख्या ९९ किंवा १०३ आहे, म्हणजेच उपलब्ध व्याकरणात हा ग्रंथ सर्वात लहान होय. सामान्य प्राकृतासंबंधी येथे जे निरुपण आहे ते अशोकाच्या धर्मलिपीची भाषा व वररुचीने आपल्या 'प्राकृत-प्रकाश' मध्ये वर्णन केलेली भाषा या दोन्हीच्या मध्यकालीन वाटते व बहुभाग अश्वघोष व थोडया प्रमाणात भास यांच्या

नाटकात वापरलेल्या भाषेशी त्यांचे साम्य आहे. कारण येथे शब्दामधील मध्यर्ती अल्पप्राण व्यंजनाचा बहुतेक लोप केलेला नाही व त्यापैकी पाचही वर्गातील प्रथम वर्णापैकी फक्त 'क' आणि तृतीय वर्णापैकी 'ग' च्या लोपासंबंधी विधान एकाच सूत्रात केले आहे. अशा रीतीने च, ट, त, प वर्णांची शब्दाच्या मध्यभागीसुध्दा लोप न करण्याची प्रवृत्ति सूचित केली आहे. या आधारावर प्राकृत लक्षण ग्रंथाचा रचनाकाल इ. २-३ रे शतक समजणे अनुचित नव्हे. प्राकृत-लक्षणमध्ये चार पाद आहेत. सुरुवातीला तद्भाव, तत्सम व देशी असे प्राकृत शब्दाचे तीन प्रका सूचित केले आहेत. त्याचप्रमाणे संस्कृत सारखेच तीन लिंग व विभक्तीच्या रचना सांगितली आहे. त्यानंतर चवथ्या सूत्रामध्ये या व्यवस्थेत काही अपवाद सूचित करुन प्रथम पादामधील शेवटच्या पस्तीसाव्या सूत्रापर्यंत नाम व सर्वनाम यंच्या विभक्तीरुपाची माहिती दिली आहे. यातील 'यद्' व 'इदम्' चे 'से' व 'अहं' चे प्रथमारुप 'हउं' याकडे विशेष लक्ष देण्यासारखे आहे. 'हउं' हे अपभ्रंश भाषेचे विशेष रुप मानले जाते. परंतु सूत्रकाळाच्या काळात याचा प्रयोग प्रचलित झाला असला तर तोपर्यंत ते रुप अपभ्रंश भाषेचे वैशिष्ठय बनले नव्हते. दुसऱ्या पादातील २९ सूत्रामध्ये प्राकृतामधील स्वरपरिवर्तन, शब्दादेश व अव्यये यासंबंधी वर्णन आहे. येथे 'गो' चा आदेश 'गावी' व पूर्वकाल वाचक धातूसाधितासाठी फक्त 'तु, त्ता, च्च, ट्ट, तु, तूण ओ व प्पि' असे प्रत्यय सांगितले आहेत. दूण, उुण व 'य' या प्रत्ययांचा येथे उल्लेख नाही.

तिस-या पादातील २३५ सूत्रात व्यंजनपरिवर्तनासंबंधी माहिती आहे. यातील पहिल्या वर्णाच्या ठिकाणी तिसऱ्या वर्णाचा आदेश लक्षात येण्यासारखा आहे. जसे एकं-एगं, पिशाची-विसाजी, कृतं-कडं, प्रतिषिध्द-

पडिसिध्दं इत्यादि. पादाच्या शेवटचय सूत्रात सांगितले आहे की, 'शिष्टप्रयोगात व्यवस्था', शेष व्यवस्था शिष्ट प्रयोगानुसार समजावी. या पादाच्य शेवटी ९९ सूत्रांची संख्या पूर्ण भरते आणि हार्नले साहेबानी पाहिलेल्या एका प्राचीन प्रतीत ग्रंथाच्या प्रारंभी सूचित केलेली एकूण सूत्रसंख्या ९९ च आहे. मूळ व्याकरण येथेच समाप्त झाले असावे. तथापि दुसऱ्या प्रतीमध्ये ४ सूत्रांचा चवथा पादही मिळतो. त्यात क्रमाने एकेका सूत्रात १) अधोरेक लोप न करणे हे अपभ्रंश भाषेचे लक्षण, २) पैशाचीमध्ये 'र' व 'ण' च्या ठिकाणी अनुक्रमे 'ल' व 'न' चा आदेश. ३) मागधीत 'र' व 'स' च्या ठिकाणी 'ल' व 'श' चा आदेश व ४) शौरसेनीत 'त' च्या ठिकाणी विकल्पाने 'द' च आदेश सांगितला आहे. प्राकृत लक्षणचे हे असे स्वरुप पाहता निश्चितपणे त्याचा विस्तार, रचना व भाषा यांच्या लक्षणावरुन हा ग्रंथ उपलब्ध असलेल्या सर्व प्राकृत व्याकरणामध्ये सर्वात प्राचीन ठरतो. यानंतरच्या व्याकरण ग्रंथावर याचा खोलवर प्रभाव पडला आहे. रचनाशैली व विषयानुक्रम या बाबतीत याच ग्रंथाचे अनुकरण आढळते. चंड याने या ग्रंथाच्या स्वरुपात व्याकरणकारासाठी एक आदर्श निर्माण करुन ठेवला आहे. त्यात त्यांनी सुरुवातीला प्राकृत लक्षणे क्रमाने सांगितली आहेत. ही पध्दती म्हणजे चंड याचेच अनुकरण होय. हेमचंद्राने तर चंडप्रमाणेच आपल्या व्याकरणाचे चार पादरुप विभाग केले आहेत आणि चूलिका, पैशाची सोडून चंड याने दिलेल्याच चार प्राकृत भाषांचे विवरण केले आहे. शिवाय चंडप्रमाणेच त्याने स्वतःच्या सूत्रावरच वृत्ती लिहिली आहे.

प्राकृत लक्षण नंतरच्या दीर्घकालखंडा जैन प्राकृत व्याकरण मिळत नाही. समंतभद्रकृत प्राकृत व्याकरणाचा उल्लेख मात्र मिळतो, परंतु तो ग्रंथ आजपर्यंत उपलब्ध झाला नाही. समंतभद्राच्या एका व्याकरण ग्रंथाचा उल्लेख देवनंदी पूज्यपादकृत जैनेंद्र व्याकरणातही आढळतो. त्यावरुन त्यांचा एखादा संस्कृत व्याकरण ग्रंथ असावा असे दिसते. तेव्हा समंतभद्राच्य एखाद्या व्याकरण ग्रंथात संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषांचे अनुशासन केले असेल तर त्यातही काहीच आश्चर्य नाही. कारण अशी पध्दत हेमचंद्राच्य रचनेमध्येही आढळते. हेमचंद्रंनी (बारावे शतक) 'शब्दानुशासन' नावाचा व्याकरण ग्रंथ लिहिला. यातील पहिल्या सात अध्यायत संस्कृत व आठव्य अध्यायात प्राकृत व्याकरणाचे विवरण केले आहे. हे व्याकरण उपलब्ध सर्व प्राकृत व्याकरणामध्ये परिपूर्ण व व्यवस्थित म्हणून प्रसिध्द आहे. यात चार पाद आहेत. पहिल्या पादातील २७१ सूत्रात संधी, व्यंजनांत शब्द, अनुस्वार, लिंग, विसर्ग, स्वर-परिवर्तन व व्यंजन-परिवर्तन यासंबंधी क्रमवार निरुपण आहे. दुसऱ्या पादातील २१८ सूत्रांमध्ये संयुक्त व्यंजनाचे बदल, समीकरण, स्वरभक्ती, वर्णविपर्यय शब्दादेश, तध्दित, निपात व अव्यय यासंबंधी विधान असून, तिसऱ्या पादातील १८२ सूत्रात कारक (विभक्तीव्यत्यय) व क्रियापदांची रुपे यासंबंधी नियम सांगितले आहेत. चौथ्या पादात ४४८ सूत्रे आहेत. त्यापैकी २५९ सूत्रात धात्वादेश दिले असून उरलेल्या सूत्रात क्रमाने शौरसेनी, मागधी, पैशाची, चूलिकापैशाची व अपभ्रंश या भाषांची विशेष लक्षणे सांगितली आहेत. प्राकृत भाषांच्या लक्षणामध्ये अपवादही आढळतात असे विधान शेवटच्या दोन सूत्रात केले आहे. या सूत्रमय ग्रंथाशिवाय हेमचंद्राने आपल्य ग्रंथावर वृत्तीही लिहिली आहे. त्या वृत्तीही लिहिली आहे. त्या वृत्तीय सूत्रातील लक्षणे, उदाहरणे देऊन विशद केली आहेत. 'अभप्राकृतम' या

प्रास्ताविक सूत्राची वृत्ती विशेष महत्वाची आहे. प्राकृत शब्दाची व्युत्पत्ति देताना संस्कृति ही प्रकृति असून, त्यापासून आलेली किंव उत्पन्न झालेली जी भाषा ती प्राकृत असे विधान केले आहे. याचा स्पष्ट अभिप्राय असा आहे की, प्राकृत शब्दाचे तीन प्रकार मानले आहेत. त्यापैकी तत्सम व देशी शब्द सोडून या व्याकरणाच्याद्वारे तद्‌भाव शब्दाच्या सिध्दीची प्रतिज्ञा केली आहे. त्यांनी तिसऱ्या व अन्य अनक सूत्रांच्या वृत्तीमध्ये अर्ष प्राकृताचा उल्लेख केला आहे. व त्याची उदाहरणेही दिली आहेत. अर्ष याचा अभिप्राय जैन आगमग्रंथांची अर्धमागधी भाषा असा आहे. हेमचंद्राच्या पूर्वी लिहिलेले, 'प्राकृत-लक्षण' व 'प्राकृत-प्रकाश' हे दोन व्याकरण ग्रंथ व हैम व्याकरण यांची तुलना केली तर दोन्हीमध्ये रचनाशैली व विषयक्रम एकसारखाच आढळतो. तरी पण हैम व्याकरणात सर्व प्रक्रिया अधिक विस्ताराने दिल्या असून, काही नवीन विधींचाही समावेश केला आहे. आणि हे स्वाभाविकही आहे. कारण वररुचीच्या अपेक्षेने हेमचंद्रासमोर ५-६ शतकातील भाषांचा विकास व साहित्य उपलब्ध होते. त्यांनी त्याचा पूर्ण उपयोग करुन घेतला आहे. चूलिका पैशाची व अपभ्रंश यांचा उल्लेख वररुचीनेही केला नाही. हेमचंद्राने याही प्राकृत भाषांची लक्षणे दिली आहेत. अपभ्रंश भाषेचे विवरण तर शेवटच्या ११८ सूत्रामध्ये फारच विस्ताराने केले आहे. त्यापेक्षाही महत्वाचे वैशिष्टय म्हणजे या सर्व नियमांची उदाहरणे अपभ्रंश भाषेतील पूर्ण श्लोक उध्दृत करुन स्पष्ट केली आहेत. त्यामुळे या काळापर्यंतच्या अपभ्रंशमधील साहित्यसंपदेचाही अंदाज करता येतो. हेमचंद्रानंतर त्रिविक्रम, श्रुतसागर व शुभचंद्र यांनी रचलेले प्राकृत व्याकरणावरील ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु या ग्रंथामध्ये रचना, विषय व शैली या बाबतीत हैम व्याकरणापेक्षा जास्त प्रगती होऊ शकली नाही. एवढेच नव्हे तर अपभ्रंश भाषेची हैम व्याकरणाइतकी परिपर्णत दुसऱ्या कोणत्याही ग्रंथामध्ये आढळत नाही. मात्र त्रिविक्रमाच्या ग्रंथात काही मौलिक उदाहरणे आढळतात.

इनद्रश्चन्द्रः काशकृस्नापिशली शाकटायनः। पाणिन्यमरजैनेन्द्रा जयन्त्यष्टौ च शाब्दिकाः ।।

हा श्लोक मुग्धबोधाचे कर्ते पं. बोपदेवांचा समजला जातो. या श्लोकात व्याकरणकारांचे दोन विभाग दिसतात. पहिल्या विभागात इंद्र, चंद्र, शाकटायन, काशकृत्स्न व पाणिनी हे पाच प्राचीन वैयाकरणी होते. दुसऱ्या विभागात अमर, जैनेंद्र व इंद्र या तिघांचा समावेश होतो. यावर सूक्ष्म विचार करता दिसते की, पाणिनीच्य पूर्वीही व्याकरणाचे अध्ययन-अध्यापन विशेष स्वरुपात होत होते. प्रतिशाख्य, तिरुल व अष्टाध्यायी मध्ये सुमारे ६४ आचार्यांचा उल्लेख झाला आहे, ज्यांनी त्याकाळातही शब्दशास्त्रसंबंधी सखोल चर्चा केलेली होती. त्यापैकी इन्द्र, शाकटायन अपिशली व काशकृत्स्न इत्यादींचे व्याकरण उपलब्ध नाही, तथापि व्याकरणकार व त्यांचे ग्रंथ यांचे अस्तित्व निश्चित होतेञ (पाणिनीने या व्याकरणग्रंथाच्या आधारावर व सारासारबुध्दीने शब्दसामग्रीचा संग्रह करुन आपला अष्टाध्यायी ग्रंथ रचला असल्याची शक्यताही नाकारता येत नाही. तथापि नंतरच्या काळात पाणिनीचा ग्रंथ परिपूर्ण असल्याने, स्वतंत्र व्याकरणग्रंथाची निर्मिती झाली नाही. केवळ वार्तिक, भाष्य व वृत्ति इत्यादींचीच निर्मिती झाली.) पाणिनीच्या अष्टाध्यायीत असलेल्य सूत्रांवरुनही पाणिनीच्या पूर्वी होऊन गेलेल्या कित्येक व्याकरणकारांची माहिती मिळते.

उदा.- १) व्योर्लघु प्रयत्नतरः शाकटायनस्य । (८-३-३०) शाकटायनाचार्य,

२) इ चाक्रवर्मणस्य- ६-१-१३०- चाक्रवर्मण

३) वासुप्यापिशले: - ६-१-९२- आपिशली

४) लोप: शाकल्यस्य- ८-३-३९- शाकल्य

५) अवड स्फोटायनस्य- स्फोटायन

अशाप्रकारे स्वतः पाणिनीनेच आपल्या पूर्ववर्ती मतांचा उल्लेख करुन त्यांचे अस्तित्व प्रमाणित केले आहे. असे असले तरी पाणिनीवर श्री. शाकटायनाचार्य या जैन आचार्यांचे अधिक उपकार आहेत. शाकटायनकारांची मतेच त्यांनी अधिकांशरुपाने स्वीकारली आहेत. उदा. पाणिनीने 'लडशाकटायनस्यैव' या सूत्रात शाकटायनांच्या 'आद्विषोंसेर्जुसवा' या सूत्राचा विषय हाताळला आहे असे वाटते. अशाप्रकारे क्वचित विषयानुवाद रुपाने तर क्वचित अविकलरुपाने ग्रहण करताना पाणिनीने मुळीच संकोच बाळगला नाही, म्हणूनच शाकटायनांचे व्याकरण स्वयंपूर्ण असल्याविषयी यक्षवर्मा आयार्चांना इतका विश्वास वाटत होता की आपला विश्वास त्यांनी पुढीलप्रमाणे व्यक्त केला.

इंद्रचंद्रादिभि: शाब्दैर्यदुक्तं शब्दलक्षणमू । तदिहास्ति समस्तं च यन्नेहास्ति न तत्क्वचित् ।।

शाकटायनाचार्य खरोखरच एक थोर जैन वैयाकरणी होऊन गेले. त्यांनी लिहिलेला शब्दानुशासनग्रंथ जैन व्याकरणाचे शिरोभूषण आहे. हा ग्रंथ चार अध्यायात लिहिला गेला आहे. तसेच या ग्रंथातील सूत्रपाठ, धातुपाठ, गणपाठ, लिडानुशासन व उणादिपाठ हे पाचही पाठ अत्यंत महत्वाचे आहेत. पाणिनीने तर यांचा उणादिपाठ जसाच तसा स्वीकारला आहे. पतजलीने तर 'उणदिबहुलम्' सुत्राची व्याख्या लिहिताना शाकटायनकारविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

नाम च धातुजमाह निरुक्ते व्याकरणे शकटस्यचतोकम् । वैयाकरणानां च शाकटायन आह धातुजं नाम इति ।।

याशिवाय ऋग्वेद व यजुर्वेदातील प्रतिशाखेत आणि यास्काचार्याच्या निरुक्तीत देखील याच शाकटायनाचार्याचे नाव आढळते. यावरुन पाणिनीपेक्षा महामुनी शाकटायनार्चांना महत्वाचे स्थान होते असे दिसते. शाकटायनाचार्य जैन होते. त्यामुळे त्यांचे व्याकरण देखील जैन व्याकरणच होय.

कुशाणकाळात संस्कृत भाषेला परत साहित्यिक व राजकीय क्षेत्रात मानाचे व आदराचे स्थान मिळण्यास सुरुवात झाली. ब्राह्मण साहित्याची निर्मिती संस्कृतमध्येच होत होती. पण त्याशिवाय या काळापासून बौध्द व जैन आचार्यांनी संस्कृत भाषा आत्मसात करुन निरनिराळया विषयावर या भाषेंतून विपुल साहित्यलेखनास सुरुवात केली. त्यामुळेच शब्दविद्येसंबंधीच्या थांबलेल्या प्रगतीला परत चालना मिळाली. पाणिनीच्या व्याकरणावर जयादित्य कृत काशिकावृत्ति व जिनेंद्रबुध्दीकृत व्यास इत्यादींची रचना झाली. त्याचबरोबरच बौध्द आचार्य चंद्रगोमीकृत चांद्र व्याकरण व जैन आचार्य देवनंदी पूज्यपादकृत जैनेंद व्याकरण या दोन ग्रंथाची गुप्तकाळात निर्मिती झाली. पूज्यपाद देवनंदीने दोन सूत्रांमध्ये प्रसिध्द आचार्य सिध्दसेन (वेत्तेः सिध्दसेनस्य ५-१-७) व समंतभद्र (चतुष्टयं समंतभद्रस्य ५-४-१४०) यांचा उल्लेख केला आहे. यावरुन हे

दोन्हीही देवनंदीच पूर्वीच होऊन गेले असे दिसते. जरी सिध्दसेन दिवाकरांचा काळा निश्चित नाही तरी अंदाजे त्यांना विक्रमादित्याच्या समकालीन मानले जाते. विक्रमच्या नवरत्न दरबारात ज्या 'क्षपणक' चा उल्लेख आहे त्यांनाच विद्वान सिध्दसेन दिवाकर असे मानले जाते. श्री. राइसने सिध्दसेनांचा काळ पाचव्या शतकाचा मध्य मानला आहे. तथापि चंद्रगुप्त विक्रमादित्य व सिध्दसेन हे समकालीन मानल्यास सिध्दसेनाना चतुर्थ शतकाच्या शेवटच्या काळातील मानणे योग्य होते. जवळजवळ तोच काळ समंतभद्राचाही समजला जातो. श्री. प्रेमीजीनी आपल्या पांडित्यपूर्ण लेखात देवनंदी पूज्यपादांच्या काळाच्या संदर्भात अनेक दाखले दिले आहेत. त्यावरुनही सूचित होते की, आचार्य पूज्यपाद सुमारे पाचव्या शतकाच्या शेवटच्या काळात होऊन गेले. या संदर्भात एका विशेष दाखल्याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. त्यानुसार संवत ६६० मध्ये तयार झालेल्य दर्शनसार नावाच्य प्राकृत ग्रंथात सांगितले आहे की, पूज्यपादाचे शिष्य वज्रनंदने सर्वच ठिकाणी पुत्रेत्सव मानला आहे. शाकटायनांच्य सूत्रांतील लाघव पहा.

दक्षिण मथुरेत (५२६ विक्रम संवत ४६९ ई.) मध्ये द्राविड संघाची स्थापना केली. यावरुन श्री. पूज्यपादांचा काळ पाचव्या शतकाच्या उत्तरार्धातला सिध्द होतो. या मताचे समर्थन करणारा दुसरा पुरावा म्हणजे कर्नाटक कविचरित्रानुसार गंगवंशीय राजा अविनीतचा मुलगा दुर्विनीत (वि. सं. ५३८ इ. स. ४८१) आचार्य पूज्यपादांचा शिष्य होता. म्हणजेच आचार्य पूज्यपादांचा काळ हा इ. स. पाचव्या शतकाचा उत्तरार्ध होय हे सिध्द आहे.

जैन साहित्यातील उपलब्ध संस्कृत व्याकरणामध्ये जैनेंद्र व्याकरण सर्वात प्राचीन होय. जैनेंद्र व्याकरणाचे निर्माते आचार्य देवनंदी पूज्यपाद हे पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेल्याने या ग्रंथाचा काळही तोच असावा. गुप्तकाळापासून मध्यकाळापर्यंत उत्तरोत्तर जैनेंद्र (पाचवे शतक) चंद्र (पाचवे शतक) शाकटायन (नववे शतक) सरस्वती कंठाभरण (११ वे शतक) व प्रसिध्द हैदशब्दानुशासन (१२ वे शतक) ही नवीन नवीन व्याकरणग्रंथाची जी श्रृंखला निर्माण झाली त्यातील जैनेंद्र व्याकरण हे पहिले असामान्य पूज्य होय. जैनेंद्र व्याकरणात पाच अध्याय आहेत. म्हणून तयास पंचध्यायी असेही म्हणतात. त्यात एकशेष प्रकरण नसल्याने काही लेखक त्याला 'अनेकशेष व्याकरण' असेही म्हणतात. पूज्यपादकृत सर्वार्थसिध्दि, अकलंककृत तत्वार्थ राजवर्तिक व विद्यानंदिकृत श्लोकवार्तिक या ग्रंथात या व्याकरणाची सूत्रे उद्धृत केली आहेत. त्यातील प्रत्येक अध्यायात ४-४ पाद आहेत. एकूण सूत्रसंख्या ३००० आहे. या ग्रंथाची रचनाशैली व विषयक्रम पाणिनीच्य अष्टाध्यायीप्रमाणेच आहे. जैनेंद्र व्याकरणाच्या कर्त्याने पाणिनीय गणपाठाचे अत्यंत योग्यप्रकारे रक्षण केले आहे. त्यामुळेच ज्याप्रमाणे पाणिनीने 'पूर्वमासिध्दम्' सूत्राने आपल्या व्याकरणाचे सपादसप्ताध्यायी व त्रिपादी असे दोन भाग केले आहेत. त्याचप्रमाणे त्याच सूत्राने (५।३।२७) याही व्याकरणाचे सार्धद्विपादचतुराध्यायी व साधैकपादी असे दोन भाग केले आहेत. तरीही या व्याकरणाची स्वत:ची अशी काही खास वैशिष्टये आहेतच. उदा.-

**- तुलना -**

| जैनेंद्र व्याकरण | पाणिनीय व्याकरण |
|---|---|
| १) ल. कर्मणि च भावे च घे: | १) ल: कर्मणि च भावे चाकर्मकेभ्य: |
| २) हलोन्तरा: स्फ: | २) हलोन्तरा: संयोग: |
| ३) ईदूदेद् द्विर्दि: | ३) ईदूदेद्द्विवचनं प्रगृह्यम् |
| ४) भूवादयो धु: | ४) भूवादयो धातव: |
| ५) परिव्यवक्रिय: | ५) परिव्यवभ्य: क्रिय |
| ६) विपराजे: | ६) विपराभ्यां जे: |
| ७) निविश: | ७) नेर्विश: |
| ८) व्याङ:श्चरम: | ८) व्याङपरिभ्योकरम: |

पान नं. ३५४ वरुन

| | |
|---|---|
| ९) विशेषणं विशेष्येवेति | ९) विशेषणं विशेष्येणम् बहुलम् |
| १०) पति:से | १०) पति: समास एव |
| ११) दूरान्तिकार्थे: स्ता च | ११) दूरान्तिकार्थेस्तृतीया |
| १२) दिवादे: श्य: | १२) दिवादिभ्य:श्यन् |
| १३) सर्वादि सर्वनाम | १३) सर्वादीनि सर्वनामानि |
| १४) प्रादि: | १४) प्रादय: |

पाणिनी व जैनेंद्र व्याकरणाच्या सूत्राकडे पाहिल्यास पाणिनीच्या सूत्रापेक्षा जैनेंद्राच्या सूत्रात अर्थपूर्ण लाघव आहे हे सहज कळून येण्यासारखे आहे. अशाप्रकारे सूक्ष्मता हाच सूत्रांचा निकर्ष मानल्यास नि:संशय जैनेंद्राची सूत्रेच पाणिनीच्या सूत्राहून अधिक वैज्ञानिक आहेत हे उघडच आहे.

जैनेंद्र आणि पाणिनीच्या पुष्कळशा सुत्रामध्ये पूर्णतया साम्य असल्याचेही दिसून येते. त्याकरिता पुढील सूत्रे पहा-

| | |
|---|---|
| १) स्थानेन्तरतम: | २) स्वरितेनाधिकार: |
| ३) न गतिहिंसार्थेभ्य: | ४) आङोयमहन: |
| ५) धारेसत्तमर्ण: | ६) साधकतमं करणं |

| | |
|---|---|
| ७) अभिनिविशश्च | ८) अकथितं च |
| ९) स्वतंत्रः कर्ता | १०) समर्थः पदविधीः |
| ११) नदीभिश्च | १२) मयूरव्यंसकादयश्च |
| १३) याजकादिभिश्च | १४) चार्थे द्वन्द्वः |
| १५) अल्पाचतरम् | १६) कर्तृकर्मणोः कृतिः |
| १७) वदः सुविक्यम् च | १८) चरेष्टः |
| १९) अनद्यतने लड | २०) परोक्षे लिट |
| २१) अनद्यतने लट् | २२) थासः से |
| २३) आमेतः | २४) झेर्जुस् |
| २५) लिडशिषि | २६) किदाशिषि |
| २७) लिड सीयुट् | २८) लोटो लडवत् |

सूत्रातील अशा प्रकारची एकरुपता पाहून जैनेंद्रकारांचा पाणिनीवर चांगलाच प्रभाव होता हे नाकारता येणार नाही.

लाघवाच्या दृष्टिकोनातून पाहू गेल्यास खरोखरच पाणिनीच्या संज्ञापेक्षा जैनेंद्रांच्या संज्ञामध्ये लाघव टिचून भरलेले आहे. त्यामुळेच जैनेंद्रकारांना आपल्या सूत्रांना लघुत्तमरुप देता आले. हे त्यांच्या संज्ञारुपावरुन दिसून येईल.

**-संज्ञा-**

| जैनेंद्र | पाणिनी | जैनेंद्र | पाणिनी |
|---|---|---|---|
| अगः | आर्ध्द धातुकम् | अप् | चतुर्थी विभक्तिः |
| इप् | द्वितीया विभक्ति | ईप् | सप्तमी विभक्ति |
| उड | उपधा | उच् | श्लुः |
| ऐच् | वृध्दिः | का | पंचमी विभक्तिः |
| किः | सम्बुध्दिः | खं | लोपः |
| खुः | संज्ञा | गः | सार्वधातुकम् |
| गिः | उपसर्गः | गुः | अड्गम् |

| | | | |
|---|---|---|---|
| घिः | लघुः | ङः | अनुनासिकम् |
| ङि | भावकर्म | चः | अभ्यासः |
| झिः | अव्ययम् | ता | षष्ठी विभक्तिः |
| त्रः | कर्मव्यतिहारः | तिः | गतिः |
| त्यः | प्रत्यय | यः | अभ्यस्तम् |
| दः | आत्मनेपदम् | दिः | प्रगृह्यम |
| द्यु | उत्तरपदम् | धम् | सर्वनामस्थानम् |
| धिः | अकर्मकम् | धुः | धातुः |
| निः | निपातः | नप् | नपुंसकलिंगम् |
| न्यक् | उपसर्जनम् | पः | प्लुतः |
| प्रः | ह्रस्वः | बम् | बहुव्रीहीः |
| बोध्यम् | सम्बोधनम् | भा | तृतीयाविभक्तिः |
| मम् | परस्मैपदम् | मुः | नदी |
| मृत् | प्रातिपदिकम् | यः | कर्मधारयः |
| रः | द्विगुः | वा | प्रथमा विभक्तिः |
| वाक् | उपपदम् | वः | कृत्यः |
| षम् | तत्पुरुष | सः | समासः |
| सत् | वर्तमानम् | स्फः | संयोगः |
| स्वम् | सवर्णम् | स्निः | सर्वनाम |
| स्पिः | संख्या | हः | अव्ययीभावः |
| ह्रद् | तद्धित | ह्वादिः | जुहोत्यादिः |

अशाप्रकारे एकान्तवादाला मुख्यता देऊन पाणिनीने 'रामाः' सारख्या बहुवचनी प्रयोगाची सिध्दि करताना अनेकाच्या जागी एकाला शिल्लक धरण्यासाठी 'सरुपाणामेकशेषः' या सूत्राची रचना करुन प्रक्रियेला अधिकच समस्येत गुंतविले. पण पूज्यपाद जैनेंद्रांनी 'सिध्दिरनेकान्तात्' सूत्राची रचना करुन अनेकान्ताच्या स्थापनेबरोबरच शब्दप्रक्रियेच्या समस्येला गुंतागुंतीच्या जाळयातून सोडवून सोप्या राजमार्गावर आणून सोडले आहे.

वास्तविक दृष्टया शब्द-सृष्टि-प्रक्रिया सोपी बनविल्यानेच कोणताही व्याकरणकार वैज्ञानिकतेच्या उच्च आसनावर बसणाऱ्यात अग्रेसर ठरतो. अशा दृष्टिकोनातून जैनेंद्र व्याकरणकाराचे तुलनात्मक अध्ययन केल्यास जैनेंद्र व्याकरणाची महत्ता सर्वमान्य झाल्याशिवाय रहाणार नाही.

जैनेंद्र व्याकरणात वैदिकी व स्वरप्रक्रिया ही दोन प्रकरणे दिली नाहीत. परंतु पाणिनीच्या सुत्रात जी अपुर्णता होती व ज्याची पूर्ती कात्यायन व पंतजली यांनी वार्तिक भाष्यात केली. ती अपूर्णता या ग्रंथात आढळत नाही. अनेक संज्ञाच्याही नव्याने समावेश केला आहे. उदा. पाणिनीच्या व्याकरणातील प्रथमा, द्वितीया इत्यादी विभक्तिच्या

नावाऐवजी 'वा' 'इप' इत्यादी संज्ञा, निपढेसाठी 'त', आत्मने पदासाठी 'द', प्रगृहयासाठी 'दि', उत्तरपदासाठी 'द्यु' इत्यादी अनेक ध्वन्यात्मक नावे योजिली आहेत. या बीजाक्षरामुळे सूत्रात अल्पाक्षरता निश्चितच आली आहे आणि त्याबरोबरच सूत्रे समजण्यास अधिक कठीण झाली आहेत. स्वाभाविकपणेच जैनेंद्र व्याकरणावर टीकात्मक साहित्याची निर्मिती मोठया प्रमाणावर झाली आहे. श्रुतकीर्तिकृत पंचवस्तु-प्रक्रिया (१३ वे शतक) या ग्रंथानुसार जैनेंद्र व्याकरणरुपी मंदिर सूत्ररुपी स्तंभावर उभे आहे. व्यास त्या मंदिरातील रत्नखचित भूमी आहे. त्यात वृत्तिरुपी कपाट आहेत. भाष्य तेथील शयन आहे. टीकाग्रंथ या मंदिराचे मजले होत. त्यावर चढण्यासाठी पंचवस्तुरुपी सोपानमार्ग तयार केला आहे. पंचवस्तु-प्रक्रियेशिवाय या व्याकरणावर अभयनंदिकृत महावृत्ति (८ वे शतक) प्रभाचंद्रकृत शब्दाम्भोज-भास्कर-व्यास (११ वे शतक) नेमिचंद्रकृत प्रक्रियावतार असे टीकाग्रंथ आज उपलब्ध आहेत. याशिवाय इतर टीकाग्रंथ उपलब्ध नसले तर, काही भाष्यग्रंथाची व टीकाग्रंथाची रचना निश्चितपणे झाली असली पाहिजे. महाचंद्रकृत 'लघुजैनेंद्र' वंशीधरकृत 'जैनेंद्र-प्रक्रिया' व पंडित राजकुमारकृत जैनेंद्रलघुवृत्ति हे ग्रंथ अलिकडील आहेत. उपलब्ध टीकेमधील अभयनंदिकृत 'महावृत्ति' १२००० श्लोकप्रमाण असून एक महत्वाचा ग्रंथ आहे. त्यात काही उदाहरणे नवीन असून त्यांना ऐतिहासिक महत्व आहे. शालिभद्र समंतभद्र, सिंहनंदी, सिध्दसेन, अभयकुमार, श्रेणिक इत्यादी जैन नावांचा उल्लेख भरपूर असून, ग्रंथात सर्वत्र जैन वातावरण निर्माण केले आहे. श्रीदत्ताचे नाव सूत्रात आले असून या महावृत्तीमध्ये या नावाचा उल्लेख वारंवर अशारीतीने केला आहे की, श्रीदत्त एक थोर व सुविख्यात व्याकरणकार होऊन गेले असावेत असे वाटते. विद्यानंदीने आपल्य तत्वार्थश्लोकवार्तिकामध्ये श्रीदत्तकृत 'जल्पनिर्णय' ग्रंथाचा उल्लेख केला असून, त्यात जल्पाचे दोन प्रकार सांगितले आहेत. जिनसेनांनी आपल्य आदिपुराणातही त्यांना 'तप:श्रीदीप्तमूर्ति व वादीभकंठीरव' संबोधून नमस्कार केला आहे.

जैनेंद्र व्याकरणाचे वृध्दिंगत विशाल स्वरूप गुणनंदीच्या 'शब्दार्णव' मध्ये पहावयास मिळते. त्यात एकूण ३७०० सूत्रे असून जैनेंद्र व्याकरणापेक्षा ७०० सूत्रे अधिक आहेत. जैनेंद्र सूत्रामध्ये जी कमतरता होती ती

अभयनंदीने आपल्या महावृत्तीमधील वार्तिकाद्वारे पूर्ती केली होती. पण गुणनंदीने आपल्या आवृत्तीमध्ये ती सर्व पूर्ती सूत्रमय करुन जैनेंद्र व्याकरणाला त्या काळापर्यंत स्वयंपूर्ण केले. शिवाय या आपल्या स्वयंपूर्ण आवृत्तीमध्ये ज्या प्रकरणाच्या अभावामुळे चंद्रिका टीकाकाराने मूळ ग्रंथाला अनेकशेष व्याकरण म्हटले होते त्या एकशेष प्रकरणाचा देखील यात समावेश केला आहे. गुणनंदी नावाचे अनेक मुनि होऊन गेले आहेत. तथापि शब्दार्णवकार गुणनंदी तेच विद्वान असावेत की ज्यांनी तर्क, व्याकरण व साहित्य क्षेत्रात खूप ख्याति मिळविली होती व ज्यांचा गृध्रपिच्छाचे प्रशिष्य व बलाकपिच्छ यांचे शिष्य असा उल्लेख श्रवणबेळगोळ येथील अनेक शिलालेखात आढळतो. वादिराजसूरीने आपल्या पार्श्वचरितामध्ये यांचे स्मरण केले आहे. आदि-पंथाचे गुरु देवेंद्र यांचे शिष्य होते. कर्नाटक कविचरिताप्रमाणे यांचा काळ वि. सं. ९५७ निश्चित होतो. शब्दार्णवावर आतापर्यंत दोन टीका उपलब्ध झाल्या आहेत. एक सोमदेव मुनिकृत 'शब्दार्णव-चंद्रिका' शके ११२७ मध्ये शिलाहार वंशीय राजा द्वितीय भोजदेव यांच्या काळी खर्जूरिका गावातील जिनमंदिरामध्ये लिहिली होती. लेखकाने हा ग्रंथ मेघचंद्राचे शिष्य नागचंद्र (भुजंगसुधाकर) आणि त्याचे शिष्य हरिचंद्र यांच्यासाठी लिहिला होता. दुसरी टीका शब्दार्णव-प्रक्रिया होय. हा ग्रंथ चुकीमुळे जैनेंद्र प्रक्रिया या नावाने प्रकाशित झाला आहे. या ग्रंथात लेखकाचे नाव प्रकटपणे दिलेले नाही. परंतु त्याने स्वतःला श्रुतकीर्तिदेवाचे शिष्य म्हटले आहे. श्रवणबेळगोळ येथील क्रमांक १०८ व्या शिलालेखात ज्यांची मोठया प्रमाणात प्रशंसा केली आहे व ज्यांचा काळ वि. सं. ११८० मानला आहे तेच हे श्रुतकीर्ती देखील यांचे गुरु असू शकतील. तथापि यातील एक अडचण पंडित नाथूराम प्रेमीने व्यक्त केली आहे की प्रस्तुत प्रक्रियेच्या लेखकाने आपल्या गुरुला कविपति म्हटले आहे, व्याकरणज्ञ नव्हे.

देवनंदी नंतरचे दुसरे महान जैन व्याकरणकार शाकटायन होय. त्यांच्या शब्दानुशासनाची रचना अमोघवर्ष या राष्ट्रकूट राजाच्या कारकीर्दीत शके ७३९ व ७८६ च्या मध्यंतरी झाली. एक प्रसिध्द टीकाकार व पार्श्वनाथ चरित्रकतर्े वादिचंद्र याने या व्याकरणकाराचे नाव पाल्यकीर्ति असेही असल्याचे सूचित केले आहे. पाणिनीने ज्यांचा उल्लेख केला आहे ते प्राचीन व्याकरणकार शाकटायन व प्रस्तुत शाकटायन यांच्यात गोंधळ होऊ नये म्हणून यांचे दुसरे नाव पाल्यकीर्ति असे सुचविले असावे. मूळ जैनेंद्र व्याकरणात जी कमतरता व अपूर्णता होती ती सर्व या शब्दानुशासनात भरुन काढली आहे. एवढेच नव्हे तर यामध्ये अनेक गोष्टी मौलिकही आहेत. उदा. यातील प्रारंभीची प्रत्याहार सूत्रे पाणिनीय परंपरेपेक्षा काहीशी निराळी आहेत. 'ऋलृक' ऐवजी केवळ 'ऋक' असा पाठ आहे, कारण 'ऋ' व 'लृ' यामध्ये अभेद मानला आहे. त्याचप्रमाणे उपांत्यसूत्र श, ष, स, र मध्ये विसर्ग जिह्वामुलीय व उपध्मानीय यांचाही समावेश केला आहे. जैनेंद्रसूत्र व महावृत्तीमध्ये पाणिनीय प्रत्याहार सूत्र स्वीकारले आहे. परंतु जैनेंद्र परंपरेतील शब्दार्णवचंद्रिकेत मात्र शाकटायन 'प्रत्याहार' सूत्र स्वीकारले आहे. शाकटायनाच्या ग्रंथाचा जैनेंद्र व्याकरणातील टीकासाहित्यावर फार मोठा उपयुक्त प्रभाव पडला आहे आणि असे वाटते की हा व्याकरण ग्रंथ अधिक परिपूर्ण असतानाही

जैनेंद्र व्याकरणाची परंपरा अखंड राखण्यासाठी त्याला याचा आधार देऊन आपल्या कालापर्यंत तरी त्यात पूर्तता आणणे आवश्यक समजले असावे. शाकटायनाने आपल्या सूत्रावर स्वतः वृत्ति लिहिली आहे. आपल्या समकालीन अमोघवर्ष राजाच्या नावावरुन या वृत्तीला 'अमोघवृत्ति' म्हटले आहे. ही वृत्ति १८००० श्लोकप्रमाण आहे. याचे ६००० श्लोकप्रमाण संक्षिप्त स्वरुप यक्षवर्माच्या चिंतामणी नावाच्या लहान वृत्तीत पहावयास मिळते. इंद्रचंद्रादिक शाब्दिकांन शब्दांचे जे लक्षण सांगितले आहे त सर्व यात आहेत आणि जे येथे नाही ते दुसरीकडे कोठेही नाही. यात गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन इत्यादि निःशेष या विशेषणाच्या रुपाने लेखकाने बहुतेक अनेक शेष व्याकरणाची अपूर्णता सूचित केली आहे. या वृत्तीच्या अभ्यासाने बालक किंव अबलाही निश्चितपणे एक वर्षात संपूर्ण वाङमयाचे ज्ञाते होऊ शकतात असा स्वतः यक्षवर्माचा दावा आहे. या चिंतामणि वृत्तीवर अजितसेन याने 'मणिप्रकाशिका' नावाची टीका लिहिली आहे. मूळसूत्रावर लघुकौमुदीप्रमाणे रुपसिध्दी नावाची लहानश्ी टीका दयपाल मुनीने लिहिली आहे. लेखकाचे गुरु मतिसगर व पार्श्वनाथ चरितकार वादिराजसूरी समकालीन असल्यने ते अकराव्या शतकातील ठरतात. सिध्दांतकौमुदीच्या पध्दतीने लिहिलेला अभयचंद्र यांचा 'प्रक्रिया-संग्रह' नावाच ग्रंथ प्रकाशित झाला आहे. (मुंबई १९०७) वादिपर्वतवज्र भावसेन त्रैविद्यदेव यांनी लिहिलेला 'शाकटायन-टीका' नावाचा आणखी एक टीका ग्रंथ उपलब्ध आहे. ज्याने कातंत्ररुपमाला नावाची टीका लिहिली आणि ज्यांचा विश्वतंत्र प्रकाश नावाचाही ग्रंथ आढळतो तोच शाकटायन टीकेचा कर्ता असावा. प्रभाचंद्रने अमोघवृत्तीवर लिलिला एक न्यास ग्रंथही आहे. परंतु आतापर्यंत यातील फक्त दोनच अध्याय मिळाले. चातुवृत्तीमध्ये या ग्रंथातील व समंतभद्रकृत चिंतामणि-विषमपद-टीका यातील अवतरणे सापडतात. मंगरसकृत प्रतिपद नावाच्या आणखी एका टीकाग्रंथासंबंधी उल्लेख मिळतो.

शर्ववर्माकृत कातंत्रव्याकरणासूत्रापासून आणखी एक तिसरी व्याकरणपरंपरा निर्माण झालेली आढळते. यांचा लेखनकाल निश्चित नाही तरी, हा ग्रंथ शाकटायनापासून पूर्वीचा असून अतिप्राचीन आहे. कारण त्यावरील टीकाकारांची परंपरा सुमारे आठव्या शतकातील दुर्गसिंहापासून सुरु झाली आहे. कात्यायन पाली व्याकरणाच्या रचनेमध्ये कातंत्राचा उपयोग केला आहे. याच्या रचनेत अनेक वैशिष्टये आहेत व यातील परिभाषाही पाणिनीपेक्षा पुष्कळच वेगळी आहे. यातील सूत्रसंख्या १४०० पेक्षा जास्त आहे. दुर्गसिंहाच्या वृत्तीवर त्रिलोचनदासकृत, 'वृत्तिविवरण-पंजिका' आणि त्यावर जिनेश्वरशिष्य जिनप्रबोधकृत 'वृत्तिविवरण-पंजिका दुर्गपद-प्रबोध' (वि. सं. १३६१ पेक्षा पूर्वकालीन) असे दोन ग्रंथ आढळतात. याश्विाय ढुंढकपुत्र महादेवकृत 'शब्दसिध्दिवृत्ति' (वि. सं. १३४० पेक्षा पूर्वकालीन) महेंद्रप्रभशिष्य मेरुतुंगसुरीकृत 'बालबोध' (वि. सं. १४४४) वर्धमानकृत 'विस्तार' (वि. सं. १४५८ पेक्षा प्राचीन) भावसेनत्रैविद्यकृत 'रुपमालावृत्ति', गाल्हणकृत 'चतुष्कवृत्ति' मोक्षेश्वराकृत 'आख्यानवृत्ति' व पृथ्वीचंद्रसूरिकृत 'वृत्ति' इत्यादि टीकाग्रंथ आढळतात. एक कापाळक-विशेष व्याख्यानही उपलब्ध आहे. यावरुन मूळ ग्रंथाचे नाव 'कालापक' असेल असे वाटते. एक 'कौमार-समुच्चय' नावाचा ३१७० श्लोक प्रमाण पद्यमय टीका ग्रंथ आहे. कातंत्र-संभ्रम व विद्यानंदीकृत 'कातंत्रोत्तर' अशा नावाच्याही दोन टीका आढळतात. याशिवाय दुसऱ्याही काही टीका आहेत, पण त्यांच्या कर्त्यांची नावे मिळत

नाहीत. या ग्रंथापैकी काही विद्वान अजैनही असावेत असे वाटते. ह्या सर्व ग्रंथावरुन या व्याकरणाचा प्रचार खूप झाला होता असे दिसते. जैनेंद्र व शाकटायनाच्या ग्रंथाच्या मानाने हा ग्रंथ पुष्कळ संक्षिप्त आहे. हे ही त्याचे एक कारण असावे.

चवथे महान जैन व्याकरणकार म्हणजे 'हेमचंद्र' होत. त्यांचा शब्दानुशासन हा ग्रंथ सर्वांग परिपूर्णता व विविध वैशिष्टये या दोन्ही दृष्टीने अद्वितीय आहे. या ग्रंथाची रचना चालुक्य वंशीय गुजरातचा राजा सिध्दराज जयसिंह याच्या प्रोत्साहनाने झाली होती. त्यामुळेच या ग्रंथाचे नाव सिध्द-हेम-शब्दानुशासन असे ठेवले आहे. सिध्दराजाच्या कारकिर्दीचा काल वि. स. ११५१ ते ११९९ पर्यंत होता. याच काळात ही ग्रंथ लिहिलेला होता. जैन शब्दानुशासन पाणिनीच्या अष्टाध्यायीप्रमाणे चार-चार पादांच्या आठ अध्यायांमध्ये पूर्ण केला आहे. आठवा अध्याय प्राकृत व्याकरणासंबंधी आहे. त्याचा आढावा प्राकृत-व्याकरण विभागात आलेला आहेच. संस्कृत व्याकरणासंबंधी ३५६६ सुत्रे असून त्यात अनक्रमाने संज्ञा, संधि, कारक, समस, आख्यन, कृदंत व तध्दित या प्रकरणासंबंधी निरुपण केले आहे. सूत्रांच्य बरोबरच गणपाठ, धातुपाठ, उणादि व लिंगानुशासन देखील जोडले आहेत. त्यामुळेच हा ग्रंथ सर्वांगपरिपुर्ण झाला आहे. सूत्ररचनेत या ग्रंथात शाकटायनाचे विशेष अनुकरण केलेले दिसते. या ग्रंथात पूर्वकालीन जैन व अजैन व्याकरणकारांचा काहीना-काही छाप दिसून येते. यावर स्वतः लेखकानेच ६००० श्लोकप्रमाण एक लघुवृत्ति लिहिली आहे. ही सर्वसामान्यांच्य उपयोगासाठी असून, दुसरी १८००० श्लोकप्रमाण 'बृहतवृत्ति' विद्वानांच्यासाठी लिहिली आहे. यात व्याकरणकारांचा नामनिर्देश करुन त्यांच्या मताचे विवेचन केले आहे. या प्राचीन व्याकरणकारांमध्ये देवनंदी (जैनेंद्र) शाकटायन व दुर्गसिंह (कातंत्रवृत्तिकार) व त्याचप्रमाणे यास्क, गार्ग्य, पाणिनी, पंतंजली, भर्तृहरी, वामन, जयादित्य, क्षीरस्वामी, भोज इत्यादींचा उल्लेख आहे. हेमचंद्राने यातील विधिविधानांमध्ये आपल्या कालापर्यंतच्या भाषाशास्त्रीय विकासाचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे. ऐतिहासिक दृष्टीने हा भाग महत्वाचा आहे. उणादि सूत्रावर व लिंगानुशासनाच्या पद्यमय रचनेवर कर्त्याचे 'स्वोपज्ञ विवरण' आहे. शिवाय ग्रंथकाराने एक लघु व दुसरा एक बृहत् न्यास लिहिला होता. त्याही प्रती उपलब्ध असून, बृहत्न्यासामध्ये ९००० श्लोक असल्याचे सांगतात. मात्र निरनिराळया ८-९ पदावर केवळ ३४७० श्लोकप्रमाण ग्रंथ सध्या उपलब्ध आहे. हा संपूर्ण व्याकरणग्रंथ सव्वालाख श्लोकप्रमाण आहे. याशिवाय आणखी २० महाकाव्य ग्रंथाची रचना करणाऱ्या या लेखकाचा हा एवढा विशाल व्याकरणग्रंथ पाहून सामान्य माणसाची बुध्दि चकित झाल्याशिवाय रहात नाही. शिवाय या व्याकरण-सामग्रीची समाप्ती येथेच होत नाही. हेमचंद्राने आपल्या 'द्वयाश्रय' काव्याच्या पहिल्या वीस सर्गामध्ये या व्याकरणातील उदाहरणे क्रमशः सादर केली आहेत. अशा ग्रंथावर टीक, टिप्पणी लिहिण्याची दुसऱ्याला उरतच नाही. तरीदेखील त्यावर मुनिशेखरसूरिकृत 'लघुवृत्ति-ढुंडिका', अभयचंद्रकृति 'बृहत्वृत्ति-अवचूरि' जिनसागरकृत 'दीपिका' अशा या ग्रंथाच्या विविध प्रकरणासंबंधी सुमारे दोन डझन टीका उपलब्ध आहेत. यावरुन या ग्रंथाविषयी विद्वानांचा आदर, लोकांमधील प्रचार व प्रसिध्दि या गुणांची कल्पना येते.

याशिवाय मलयगिरिकृत सोपज्ञ टीकेसहित 'शब्दानुशासन' किंवा 'पृष्टि व्याकरण' दानविजयकृत शब्दभूषण अशा अनेक संस्कृत व्याकरण ग्रंथाची रचना झाली आहे. परंतु त्यात वरील ग्रंथांचेच अनुकरण झालेले असन, रचना व विषय यासंबंधी मौलिकता आढळत नाही.

प्राकृत भाषांचे व्याकरण वेळोवेळी विभिन्न लेखकांच्याद्वारे रचण्यात आले आहे. प्राचीन भारतीय व्याकरणकाराकडून पुढील ग्रंथ रचण्यात आले आहेत.

१. प्राकृत प्रकाश-वररुचि (प्रकाशित)
२. प्राकृत लक्षण-चंड (प्रकाशित)
३. प्राकृत व्याकरण-हेमचंद्र (प्रकाशित)
४. प्राकृत संजीवनी-बसंतराज
५. प्राकृत कामधेनू-लंकेश्वर
६. प्राकृत व्याकरण-समंतभद्र
७. प्राकृत व्याकरणवृत्ति-त्रिविक्रम
८. प्राकृत प्रबोध-नरचंद्र
९. प्राकृत प्रक्रियावृत्ति-उदय सौभाग्य (प्र.)
१०. प्राकृत चंद्रिका-शेषकृष्ण पंडित
११. प्राकृत चंद्रिका-रामनाचार्य
१२. प्राकृत मनोरमा-चंडीवर शर्मा
१३. प्राकृत रुपावतार-सिंहराज (प्र.)
१४. प्राकृत दीपिका-चंडीवर शर्मा
१५. प्राकृत कल्पतरु-रामतर्कवागीश (प्र.)
१६. प्राकृत मंजरी-कात्यायन (प्र.)
१७. प्राकृत सर्वस्व-मार्कण्डेय (प्र.)
१८. प्राकृतानंद-रघुनाथ शर्मा
१९. प्राकृत प्रदीपिका-नरसिंह
२०. प्राकृत मणि दीपिका-चिन्नवाम भूपाल
२१. प्राकृत मणिदीप-अप्पभज्वन् (प्र.)
२२. षडभाषा मंजरी-अज्ञात
२३. षडभाषा वार्तिक-अज्ञात
२४. षडभाषा चंद्रिका-लक्ष्मीधर (प्र.)
२५. षडभाषा चंद्रिका-भामकवि
२६. षडभाषा चंद्रिका-लक्ष्मीधर (प्र.)
२७. षडभाषा रुपमालिका-दुर्गाणाचार्य
२८. संक्षिप्तसार प्राकृतवाद-कुमदीश्वर
२९. प्राकृत व्याकरण-शुभचंद्र

जैन विद्वानांनी साहित्याच्या क्षेत्राबरोबरच व्याकरणाच्या क्षेत्रातही असामान्य कार्य केलेले दिसते. व्याकरण शास्त्रातील त्यांचे कार्य आनुनिक काळ मुलभूत कार्य म्हणून मानले जाते.

**जैन साहित्याचे इतिहासातील स्थान**

**१. भारतीय इतिहासाची सामुग्री-**

जेथे आम्ही राहतो ती भारतभूमी एखाद्या उपनिवेशाप्रमाणे नवीन झालेली वसाहत नव्हे. भारत देश जगातील अत्यंत प्राचीन असा देश आहे. तो आपल्या वैशिष्टयाने नेहमी सौम्य आणि सुंदर प्रकृतीचे निवासस्थान बनला आहे. येथे प्राकृतिक सहा ऋतु आळीपाळीने वैभव प्रकट करत असतात. निसर्ग आपली देणगी येथे मुक्त हस्ताने उधळत आला आहे. आपल्या या अलौकिक रुपामुळे सर्वांचेच कायमचे आकर्षक स्थान होऊन राहिला आहे.

इतिहासाच्या अत्यंत प्राचीन अशा अचुक प्रकाशापासून आतापर्यंत हा देश अनेक जातीचे मीलनस्थान बनलेला, अनेक संस्कृतीची जोपासना करणारा, अनेक विचार प्रवाहाचे संगम स्थान होऊन राहिला आहे. कितीतरी क्रांत्या येथे घडून आल्या आहेत. तसेच हा देश आपल्या प्रमुख शासकांच्या नावांनुरुप अनेक नांवेही धारण करीत आला आहे. इक्ष्वाकुवंशीय भारताच्या काळी भारतवर्ष, वैन्य पृथुच्या काळी पृथिवी, वैदिक आर्यांच्या काळी 'आर्यावर्त', ब्रह्मवाद्यांच्या काळी 'ब्रह्मावर्त', यवनांच्या काळी 'हिंदुस्थान' आणि ब्रिटीशांच्या काही 'इंडिया' या नांवाने प्रसिध्दी झाली आहे.

याच्या इतिहासाचा काळ फार विस्तृत आहे. एकीकडे तो महाप्रलयकालाला भिडला आहे तर दुसरीकडे आधुनिक कालाला येऊन भिडतो आहे. या इतक्या विस्तृत कालात ज्या ज्या लोकांचे येथे आगमन झाले, ज्या ज्या सभ्य चालीरीतीचा विकास झाला त्यांनी विभूतींची पुष्कळशी स्मारके भूगर्भात समाविष्ट होऊन आज ती पुरातत्व

वस्तु बनली आहेत. त्यांच्या पुष्कळशा आठवणी आज दंतकथेच्या रुपात प्रचलीत झाल्या आहेत. पुष्कळसा इतिहास पौराणिक कथा अथवा म्हणींच्या रुपात परिवर्तीत झाला आहे. त्यांचा आचारविचारांना सुसंबध्द रुप मिळून आज त्यांना येथील धर्माचे आणि तत्वज्ञानाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. त्यांच्यातील थोर मोठया व्यक्ति, पुष्कळशा कृती आणि विद्या लिपिबध्द होऊन आज येथील साहित्याची मूलभूत सामग्री होऊन राहिली आहे. दगडाधातूवर अंकित होऊन शिलालेख, ताम्रपट आदि रुप धारण करुन आहे.

भारतीय इतिहासाला क्रमबध्द रुप द्यावयाचे झाल्यास खालील सर्व सामग्री योग्य रित्या संकलिक केली पाहिजे.

१) पुरातत्व वस्तु, २) दंतकथा, ३) म्हणी आणि पौराणिक कथा, ४) चालीरिती, ५) धार्मिक प्रथा आणि दार्शनिक सिध्दांत, ६) वैदिक, पौराणिक, जैन आणि बौध्द साहित्य, ७) शिलालेख, ताम्रपट आणि नाणी.

वरील आवश्यक सामग्रीबरोबरच ज्य देशाशी या देशाचा सांस्कृतिक आणि व्यापारी संबंध घनिष्ट रुपाने आला आहे अशा इराण, असीरिया, बाबिलोनिया, अरबस्थान, मिश्र आणि चीन या देशांचे ऐतिहासिक

शोध अथवा मॅगेस्थनीज, हेरोडोटस्, स्टेबो, फाहियान, हयुएनत्संग, इत्सिंग, आल्बेस्नी, इनबतूता आदि परदेशी प्रवाशांचे भारतासंबधांचे उल्लेख यांचीही अत्यंत आवश्यकता आहे.

**२. भारतीय इतिहासाशी अन्याय-**

भारताच्या प्राचीन संस्कृतीशी सत्ता आणि स्थिरता, तिची गंभीरता आणि वैभव, तसेच तिचा विकास आणि उत्थान घडविण्यात श्रमण आणि ब्राह्मण यांचा प्रमुख वाटा आहे. त्यापैकी श्रमणाचे प्रतिनिधी आज बहुतेक शैव, शाक्त, जैन आणि बौध्द हे लोक आहेत आणि ब्राह्मणाचे प्रतिनिधि अधिकतर वैदिक धर्मानुयायी आहेत. म्हणून भारतीय संस्कृति आणि तिचा इतिहास समजण्यासाठी वरील पाचही पंथाच्या साहित्याचे आणि कलांचे क्रमबध्द परिशीलन तसेच त्यांच्या दंतकथा, पुराणकथा, मान्यता आणि रीतीरिवाज या सर्वांचे एकीकरण करणे आवश्यक आहे. त्यापैकी एकाला जरी वगळले तरी भारतीय इतिहासाशी अन्याय घडेल मग तो भारताचा इतिहास म्हणण्यास पात्रच होणार नाही. तो फक्त भारतातील एखाद्या जातीचा सांप्रदायिक इतिहासच होऊ शकेल. अशा इतिहासात भारताचे सर्वांगीण दर्शन घडणार नाही.

पण दुःखपूर्वक म्हणावे लागेल की, इतिहास लिहिताना आजपर्यंत ज्या साहित्याचे आणि कलेच परिशीलन झाले ते बहुतांश ब्राह्मण साहित्याचेच होय. त्याच्याच आधारावर परंपरागत गोष्टी आणि पौराणिक कथांचा संग्रह केला गेला आहे. ब्राह्मणेतर धर्माचे साहित्य, त्या धर्माच्या स्थ्तिपालकता, आपले तथ्य अथवा ग्रंथ दुसऱ्याला न कळू देणे, त्यामुळे सुरुवातीला तर त्यांच्या ग्रंथाचे परीक्षणच होऊ शक ले नाही. जे कांही थोडेबहुत झाले ते अव्यवस्थित आणि अपुऱ्या स्वरुपातच झाले. त्यात देखील विद्वानांच्या जुन्या ब्राह्मण मताच्या धारणा आडव्या आल्याच. परिणामतर्: भारतातील प्राचीन धर्माच्या अस्तित्वालाच नकार दिला गेला. इतर धर्मांना वैदिक धर्माची शाखा मानले गेले. भारतीय इतिहासाची सुरुवात वैदिक आर्यांपासुन केली जाऊ लागली आणि भारतीय संस्कृती, भाषा, वेशभूषा, शस्त्रास्त्र, वाहन, व्यवसाय, ग्राम-नगरादिकांचा मूलाधार ब्राह्मण संस्कृतीला ठरविले गेले.

३. **ब्राह्मणेतर साहित्याचे इतिहासातील स्थान** -

प्रचलित इतिहासाचे अध्ययन केल्यावर असे वाटू लागते की, जणु काय वैदिक आर्यांच्या पूर्वी भारताची स्वतंत्र वस्ती अथवा संस्कृतीच नव्हती, असलीच तर ती जंगली, भिल्ल लोकांची किंवा असभ्य, क्रूर अशा द्रवीड लोकांची, परंतु आता जसजसे शैव, शाक्त, जैन आणि बौध्द साहित्य उजेडात येऊ लागले, पुराण वस्तूंचा नवनवा शोधा लागू लागला तसतसे ब्राह्मण साहित्याचे ऐतिहासिक दृष्टया आलोकन होऊ लागले आणि इतिहासतज्ञ आपल्या जुन्या धारणा सोडून एकमुखाने म्हणत आहेत की, वर उल्लेखिलेला भारतीय इतिहासाचा निष्कर्ष पूर्णतया असत्य आहे. तो केवळ ब्राह्मणेत्तर साहित्याच्य विरुध्दच नव्हे तर ब्राह्मण साहित्याच्याही विरुध्द आहे.

हे सत्य उजेडात आणण्यास भारताच्या विशाल साहित्यापेक्षा अधिक सिंधु काठच्या मोहेंजोदारो आणि रावी काठच्या हरप्पा येथील प्राचीन अवशेषात मिळालेल्या पुरातत्व वस्तूंमुळे अधिक प्रोत्साहन मिळाले आहे.

४. **जैन साहित्याची विशेषता** -

हिंदु साहित्यिक आणि कला यावर ब्राह्मण आणि श्रमण या उभयतांच्या प्रभावाचे असे काही मिश्रण झाले आहे की, ते आज वेगळे करणे, त्यांचा वेगवेगळा दर्जा ठरविणे अशक्यप्राय होऊन बसले आहे. परंतु जैन साहित्य आणि कला यावर ब्राह्मण प्रभावाची छाप पडली असली तरी, तिने आपला प्राचीन श्रमण संस्कृतीशी असलेला संपर्क त्यागलेला नाही. स्वतःचे विशुध्द रुप निर्बाध राखून आहे. त्यामुळेच भारताच्या इतिहासातील श्रमणांच्या आचारविचारांचा दर्जा आणि महत्व ठरविता येते.

१) भ. महावीरापूर्वीच्या सगळयाच साहित्यात श्रमण संस्कृतीला दाबण्याचा, दडविण्याचा प्रयत्न केला आहे. क्वचित् उल्लेख आढळाल तरी तो न कळत चुकूनच. त्याच श्रमण संस्कृतीला नेहमीच गौण स्थान दिले गेले आहे. तिच्याविषयी त्यांची 'अगा ते आम्हांशी माहितची नोहे' वृत्ति नेहमीच चालत आली आहे. यावरुन हे उघड होते की, श्रमण संस्कृति ही ब्राह्मणाची वास्तूच नव्हे. तिच्या माहितीसाठी ब्राह्मण-साहित्य शोधणे म्हणजे मरुभूमीत भातशेती हुडकण्यासारखे आहे. महावीरानंतरच्या साहित्यावर मात्र महावीराचा खोल ठसा उमटला आहे. त्यामुळे मध्ययुगीन हिंदुसाहित्य श्रमण संस्कृतीच्या प्रभावाने ओतप्रोत भरले आहे.

२) नेहमीच ब्राह्मणांची दृष्टी अधिदैविक राहिली आहे. म्हणून त्यांचे साहित्य आणि कला यांची दृष्टी देखील नेहमीच काल्पनिक बनली आहे. पुराणातील ऐतिहासिक गोष्टींना काल्पनिक, अमानुषिक दिव्य स्वरुपात प्रकट केले आहे. या उलट क्षत्रियांची दृष्टी नेहमी आध्यात्मिक मानवी स्वरुपातच राहिली. त्यामुळेच त्यांचय साहित्याची आणि कलेची दृष्टी वस्तुस्थितीला धरुन राहिली असल्याने त्यांच्य साहित्यात आणि कलेत ज्या ऐतिहासिक गोष्टीचे वर्णन आहे ते, वास्तवतेला धरुन मानुषिक रुपात दाखविले असल्याने समजण्यास पण सोपे आहे.

३) जैन साहित्यातील समस्त ग्रंथ उत्पत्ति कालापासून आजर्यंत प्रायः जसेच्या तसे उपलब्ध आहेत. त्यात न्युनाधिकता केली गेली नाही. यामुळे ते साहित्य ऐतिहासिक दृष्टीने अधिक प्रामाणिक आहे.

४) हिंदु साहित्यात ज्या पुरुषांनी बाहय शांति, कौटुंबिक मर्यादा, समाज व्यवस्था आणि राष्ट्रीय संघटन निर्माण करण्याचा, वाढविण्याचा अथवा कायम ठेवण्याचा प्रयत्न केला अशाना महापुरुष मानले आहे. उलट जेन साहित्यात ज्यांनी आपल्या प्रचाराच्या जोरावर मनुष्याला सर्वोच्च आदर्श दाखविला, स्वतःच्या ज्ञानबलाने सर्वश्रेष्ठ सत्य सांगितले आणि आपल्या निर्मळ आचारबलाने अक्षय सुखाचा मार्ग दाखविला अशाना महापुरुष मानले आहे.

५) संपूर्ण इतिहासच्या मंथनातून जीवनोपयोगी तत्व निघत असेल तर ते एकमेव 'स्याद्वाद' होय आणि ती जैन साहित्याची अभुतपूर्व अशी देणगी आहे. आदर्शाशिवाय विधान आणि विधानाशिवाय आदर्श व्यर्थ केवल कल्पनापात्र आहे. दोनही गोष्टी एक दुसऱ्याच्या सहयोगी आहेत. निश्चयाशिवाय संपूर्ण व्यवहार हे अर्थशून्य भवभ्रमण आहे आणि व्यवहाराशिवाय केवळ निश्चय म्हणजे स्वप्नरंजन आहे. आदर्शाशिवाय विधान हे भाररुप आहे आणि विधानाशिवाय आदर्श म्हणजे कपोलकल्पना आहे. या दोहोत सहयोग असणे अत्यंत आवश्यक आहे.

ज्या ज्या वेळी एखाद्या जातीने अथवा संप्रदायाने एकत्र बाजू उचली. दुसऱ्या बाजूचा त्याग केला, त्या त्या वेळी त्या जातीने अथवा संप्रदायाने स्वतःची फसवणूक केली, संकटे ओढवून घेतली, दुःखातच शेवट झाला. म्हणून 'एकांताचा सर्वथा त्याग केला पाहिजे' हे भारतीय संस्कृतीचे एकमेव सार आहे. हेच तत्व ज्ञातपुत्र भगवान महावीरांच्या स्याद्वाद सिध्दांन्ताचा आधारस्तंभ आहे. वीर-दर्शन जणु काय भारतीय संस्कृतीचे सार आहे. भारतीय विचारधारांचा तो संगम आहे. भारतीय तत्वज्ञानाची सन्मान्य व्यवस्था आहे. ज्या विचारांचा भारतात विकास झाला त्या विचारांना वीर दर्शनात स्थान आहे. वीरदर्शनात ज्याला स्थान मिळाले नाही तो भारतीय विचारच नव्हे. यासाठी भारतीय विचारधारांचे स्थान आजमावण्यासाठी जैन साहित्य जाणणे अत्यंत आवश्यक आहे. वैदिक साहित्यातील आध्यात्मिक आणि पौराणिक प्रकरणांना योग्य रितीने समजून घेण्यासाठी जैन साहित्याची परंपर आणि मान्यता यांचे ज्ञान होणे अत्यंत आवश्यक आहे.

६. जैन साहित्यात देवाहून मानवाला अधिक महत्व दिले आहे. मानव तपाच्या प्रभावाने ऋध्दि-सिध्दि प्राप्त करुन घेऊ शकतो. देव मनुष्याचे काहीही करु शकत नाही. उलट मनुष्यच आपल्या व्रत आणि तपश्यर्चेच्या प्रभावाने देवाना कांही करावयास भाग पाडतो. देव धर्मोपदेश ऐकण्यास लालायित असतात. ते तीर्थकराच्या समवशरणात येतात. योग्यांचे ते दास बनतात.

७. जैन साहित्यात देव, शास्त्र, गुरु आणि धर्म यांचा जो आध्यात्मिक आदर्श त्यांच्या लक्षणासह मानला आहे ती एक त्याचीच विशेषता आहे. दुसऱ्या कोणत्याच साहित्यात अशा प्रकारचे स्वरुप आढळणार नाही.

८. जैन साहित्यात कर्मकाण्डाहून सदाचाराला अधिक महत्व दिले गेले आहे. स्वतः केलेल्या बऱ्या वाईट कर्माचे फल भोगावेच लागते. जगातील कोणतीच शक्ति त्यातून सोडवणूक करुन शकत नाही. म्हणून ब्राह्मणांनी मानलेल्या हिंसात्मक यज्ञांचा तीव्र विरोध केला गेला आहे आणि अहिंसेला जीवनाचा आदर्श मानले आहे.

९. जैन साहित्यानुसार जग हे अनादिनिधन-अकृत्रिम आहे. तु पुरुषाकार आहे. महाविस्तीर्ण आणि दु:खमय आहे. तसेच ते परिवर्तनशील आहे त्यामुळे वेळोवेळी त्याचा प्रलय आणि उत्पत्ति स्वभावतःच होत असते. अशा अवस्थेत त्याची भोगभूमी आणि कर्मभूमी अशा दोन तऱ्हेच्या रचना घडतात. प्रथम भोगभूमी होते आणि नंतर कर्मभूमी. भोगभूमीत अराजकपणा असल्यामुळे ती विराट असते. मागाहून आवश्यकतेप्रमाणे राज्यशासन व्यवस्था केली जाते. या व्यवस्थेलाच ब्रह्मदेवाची सृष्टी म्हटले गेले आहे, येथे ब्राह्मण साहित्यात म्हटल्याप्रमाणे जगाच्या उत्पत्तीला सृष्टी मानले नाही

१०. जैन साहित्यात ब्राह्मणांनी मानलेल्या वर्ण व्यवस्थेला स्वीकारले नाही. तिचा पावलोपावली विरोधच केला आहे. त्यातील वर्णव्यवस्था जन्मानुसार नसून ती गुणकर्मानुसार आहे. प्रथम यात तीनच वर्णाची व्यवस्था केली असून नंतर धर्मानुरागी, विवेकी व्यक्तींच्या साठी ब्राह्मण वर्णाची व्यवस्था देखील केली आहे.

११. अरिष्टनेमी, पार्श्वनाथ हे नागवंशी होते. वैदिक साहित्यात ज्या व्रात्य आणि यति लोकाविषयी निंदनीय उल्लेख आढळतात ते जैन साहित्यातील महापुरुष होत, व्रतयुक्त असल्यामुळे व्रात्य आणि मोक्षमार्गात यत्नशील असल्यामुळे यति या प्रमाणे जैन साधूंच्या या संज्ञा आहेत. बहुधा त्यांचा निवास पूर्व आणि पश्चिम समुद्रकिनारी होता. गुजरात प्रांतातील, बिहार प्रांतातील क्रमशः रैवतक पर्वत आणि पार्श्वनाथ हिल (सम्मेद शिखरजी) जे याच कारणाने प्रसिध्द आहेत.

**जैन आणि वैदिक साहित्यातील अंतर खालीलप्रमाणे दाखविता येईल -**

| **-जैन-** | **-वैदिक-** |
|---|---|
| १. आध्यात्मिक वास्तविक दृष्टि | आधिदैविक काल्पनिक दृष्टी |
| २. उद्देश पारमार्थिक सुखाचा | उद्देश इहलौकिक सुखाचा |
| ३. मोक्ष पुरुषार्थ | धर्म-अर्थ-काम पुरुषार्थ |
| ४. अनेकान्त शैली | एकान्त शैली |
| ५. महापुरुष व पुरुषार्थ वाद | अवतारवाद, देवतावाद, देवेच्छावाद |
| ६. सदाचार व अंहिसावाद | क्रियाकांड व हिंसक यज्ञवाद |
| ७. स्वत:सिध्द सृष्टिवाद | इेश्वरकृत सृष्टीवाद |
| ८. गुणकर्मकृत वर्णव्यवस्था | जन्मकृत वर्णव्यवस्था |
| ९. व्रात्य आणि यतींची प्रशंसा | व्रात्य आणि यतींची निंदा |
| १०. सर्व भाषा (प्राक.त, संस्कृत, अपभ्रंश, हिन्दी आदि) | केवळ संस्कृत भाषा |

११. सर्व जातीचे व वर्णाचे लेखक | केवळ ब्राह्मण लेखक

५. **जैन साहित्याचा विस्तार** -

जैन साहित्याचा विस्तार फार मोठा आहे. जैन धर्माची दृष्टि विश्वव्यापी आणिा अनेकान्तात्मक आहे. ती जगाकडे अनेक दृष्टीने पाहणारी आहे. जीवनाच्या सगळया गरजा आणि भावना याकडे लक्ष देणारी आहे. त्याचप्रमाणे त्याने निर्माण केलेले साहित्य देखील विश्वव्यापी तसेच अनेक प्रकारचे आहे. ते निव्वळ पारमार्थिकच आहे, असे नसून लौकिक देखील आहे. त्यात निव्वळ धार्मिक बाबीच आहेत असे नसून व्यावहारिक बाबींनीदेखील ते नटलेले आहे. त्याचा दृष्टिक्षेपात दार्शनिक असूनही त्याबरोबरच तो वैज्ञानिकही आहे. साहित्याचा असा एकही विषय नाही की ज्याला जैन साहित्यात स्थान नाही. ज्याचा म्हणून उपयोग असा कोणताही विषय जैन धर्माच दृष्टिकोनातून सुटला नाही.

जैन मान्यतेप्रमाणे सर्वज्ञ अहिहंताची भारती (वाणी) जगातील सर्व विद्येने ओतप्रोत आहे. तसेच तिच्या आधारे निर्माण झालेले साहित्य देखील स्वभावतःच सर्व विद्यांनी परिपूर्ण आहेक. यात न्याय, दर्शन, योग, आचार, पुराण, इतिहास, कथा, आख्यान, जीवनस्तुति, नीति-रीति, विधिविधान, स्तोत्र, काव्य, नाटक, चंपू, छंद, अलंकार, निरुक्त, शिक्ष, कोष, व्याकरण, भूगोल, ज्येतिष, गणित, फलित, मंत्र, तंत्र, शकुन, सामुद्रिक आष्टांग, आयुर्वेद, नाडी, प्राणविद्या, वनस्पति विद्या, मृगपक्षी विद्या, वास्तुकला, मूर्तिकला, चित्रकला, संगीत, आणि वादित्र कला आदि सर्वच विद्यांचा समावेश झाल आहे. म्हणून जैन भारतीला जर विश्वभारती म्हटले तर काहीच अतिशयोक्ति होणार नाही.

मौलिक रचने व्यतिरिक्त जैन साहित्यात टीका, वृत्ती, चूर्णि, भाग्य आणि वार्तिक ही देखील भरपहूर आहेत. यात भाषा, श्लोक, सूत्र वगैरे संपूर्ण भारतीय लेखन पध्दतीना अंगिकारले आहे.

ज्याप्रमाणे जैन धर्म जगाचे कल्याण करणारा आणि प्राणिमात्राचा उध्दार करणारा आहे. त्याचप्रमाणे याच्या प्रवचनाची आणि लेखनाची भाषा देखील विश्वव्यापीच होत गेली आहे. त्याने कधीच एखाद्या विशेष भाषेचा मोह ठेवला नाही. जनसामान्याच्या बोली भाषेलाच तो आपल्या संदेशाचे माध्यम बनवत आला आहे. ज्या ज्या देशात त्याने पदार्पण केले, ज्या ज्या कलेत शिरकाव केला, त्यांच्या त्यांच्या प्रचलित भाषेतच तो ज्ञानदान करत आला आहे. म्हणून त्याचे साहित्य, संस्कृत, प्राकृत, मागधी, शौरसेनी, महाराष्ट्री, गुजराथी, राजस्थानी, हिंदी, तामीळा, तेलगू, कानडी वगैरे भारताच्या उत्तर व दक्षिणेकडील तसेच पूर्व आणि पश्चिमेकडील सगळयाच जुन्या आणि नव्या भाषेत लिहिलेले आढळते.

जैन धर्म, वर्ण आणि जातीचा भेदभाव न करता सर्वांचेच आश्रयस्थान होत आला. सर्वांनाच आपली दीक्षा देत आला. सर्वांनाच आपल्या श्रावक-श्राविका, मुनि-आर्यिका या चतुर्विध संघात दाखल करीत आला. तसेच याचे लेखक आणि कलाकार देखील सर्व जातीच, सर्व वर्णाचे, सगळयाच आश्रमातील होत आले

आहेत. यति, मुनी, भट्टाकर, श्रावक, राजा, मंत्री, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे सर्वच या जैन साहित्याचा उध्दार करीत आले आहेत.

जैन साहित्यात सांगितल्याप्रमाणे जैनधर्म नेहमी क्षत्रिय कुलांचा धर्म बनत आहे. त्याचा उदय नेहमी राजघराण्यात झाला आणि राजघराण्यात तो पाळला गेला. इतिहासपूर्व कालाशिवाय भगवान महावीराचे काळी देखील याला पूर्व आणि मध्यभारतातील मगध, अवन्ती, सिन्धु, कोशल, मथुरा, काशी आदि देशातील सर्वच प्रमुख राजवंश, मंत्रीवर्ग आणि श्रेष्ठीजनांच्या आश्रयाचा गौरव लाभत आला आहे. महावीरानंतर देखील याला मगध, ओरीसा, गुजराथ, राजस्थान आणि दक्षिणेतील सर्वच शिशुनाग, नंद, मौर्य, सैर, खारवेल, राठोड, परमार, चौहाण, गंग, कदम्ब, राष्ट्रकूट, चालुक्य, होयसल वगैरे प्रमुख राजवंशाचा, अमात्यवर्गाचा आणि श्रेष्ठीजनांचा आश्रय मिळत आला आहे. नेहमीच धुलिधूसरित वीर तपस्व्यांच्या परिश्रमणाने चोहोकडील लांबलांबच्या देशात, शहरात आणि खेडोपाडी जैन धर्म पसरत आला आहे. भ. महावीरानंतरच्या काळी देखील दिगंबर आणि श्वेतांबर श्रमणाच्या अनेक संघ, गुण आणि गच्छांच्या अध्यक्षतेखाली भारताच्या कानाकोपऱ्यापर्यंत तो पसरला आहे. यामुळेच आज जैन साहित्य आणि कलेच्या रचना नक्षत्रांच्या राशीप्रमाणे संपूर्ण भारत देशात पसरल्या आहेत.

**आदिपुराण-पुराणतत्त्व**

भारतीय प्राचीन जैन साहित्यात पुराणास महत्वपूर्ण स्थान आहे. जैन पुराणातील कथा-साहित्य तर प्राचीन इतिहास व दर्शनाचा ज्ञानकोशच. जैन साहित्यात प्राचीन अनेक महापुरुषांची जीवन-गाथा वर्णित आहे. या पुराण साहित्यात संस्कृत भाषेतील पुराण साहित्यातील महापुराण ही तिसरी रचना म्हणता येईल. पहिल्या दोन रचना पद्मचरित व दुसरी पौराणिक रचना हरिवंशपुराण. महापुराणाचे दोन भाग आहेत. यापैकी ४२ पर्व व ४३ व्या पर्वाचा कांही भाग जिनसेनकृत आहेत. बाकीची रचना म्हणजे आदिपुराण व उत्तरपुराणाची रचना त्यांचे शिष्य गुणभद्राने केली आहे. ही सर्व रचना शके सवंत ८२० च्या पूर्वी पूर्ण झाली होती. आदिपुराणाच्या उत्थानिकेत पूर्वगामी सिध्दसेन, समंतभद्र, श्रीदत्त, प्रभाचंद्र, शिवकोटी, जटाचार्य, काणभिक्षु, देव, (देवनंदि पूज्यपाद) भट्टाकलंक, श्रीपाल, पात्रकेसरी, वादिभसिंह, वीरसेन, जयसेन, व कवी परमेश्वर या आचार्यांची स्तुती केली आहे. आदिपुराण प्रथम तीर्थकर वृषभदेव व त्यांचे ज्येष्ठ पुत्र भरत चक्रवर्तीच्या सरस आख्यानामध्ये पूर्ण होते. त्यात जैन सिध्दांताचे इतस्ततः दर्शन होते. या पलीकडे जाऊन असे म्हणता येईल की जैनधर्म व जैन आख्यानांचेच ज्ञान व्हावे म्हणून या ग्रंथाचे जितके महत्व आहे, त्यापेक्षाही त्याचे महत्व भारतीय समाज व संस्कृतीच्या अध्ययनाच्या दृष्टीने आहे. याचा अर्थ असा की आदिपुराणाच्या अध्ययनाने भारतीय संस्कृतीच्या प्राचीन मूल्यांचे समग्र दर्शन होते. कोणत्याही साहित्याचे निरुपण करताना विभिन्न

शैलीचा अवलंब केलेला दिसतो. कधी तथ्यनिरुपणासाठी, कधी रुपकथनासाठी तर कधी वस्तुस्थितीचे अतिशयोक्तीपूर्ण वर्णनात त्याचा उपयोग होतो. पौराणिक स्वरपाच्य ग्रंथामध्ये विशेषतः तृतीय शैली आलंकारिता व अतिशयोक्तीपूर्ण पध्दतीचा अवलंब दिसतो. आदिपुराणात तर या शैलीचे अवलंबर सर्वत्र दिसते.

आदिपुराणामध्ये पुरातनं पुराणं स्थान (आदि १।२१) प्राचीन आख्यानास पुराण म्हटले आहे. ज्यात केवळ एका शलाका पुराणाच वर्णन असते त्यास पुराण म्हणतात. चरित्रात्मक कथानक असल्यामुळे चरित्र पण म्हणतात. पौराणिक साहित्यामध्ये काही परंपरेने आख्यान आलेले असते. अशी एक लोकधारणा असते की सामान्य कथा ही काल्पनिक असते त पौराणिक कथा ही सत्य घटनेवर आधारित असते. यांचा उद्देश प्राचीन रीतीरिवाज दाखवून धार्मिक श्रध्दा निर्माण करणे हा असतो. प्राकृतिक सामर्थ्य, देव-देवतांचे अस्तित्व व त्यांचे मानवी संबंध व यातील रहस्य यामुळे लक्षात येते. धार्मिक आचार-संहितेच तर पुराणाशी घनिष्ट संबंध आहे. म्हणून पुराणामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समन्वय होऊ शकतो यासंबंधी खालीलप्रमाणे समजूत आहे-

१) महापुरुष-शलाका पुरुष चरित, २) ऋतुपरिवर्तन, ३) प्राकृतिक-शक्तिवर्णन, ४) असाधारण घटना वर्णन, ५) स्वर्ग-नरक वर्णन, ६) पुनर्जन्म-पाप-पुण्य वर्णन, ७) सामाजिक संस्था व धार्मिक मान्यता वर्णन, ८) ऐतिहासिक घटना, ९) सैध्दांतिक मान्यता व निरुपण

Mythology- The science which examines myths to legends of Cosmogony and Gods and Heroes. It is also used as a term these legends themselves. This mythology of Greek means the whole body of Greek divines and heroic and Cosmogonic legends.

श्री. के. एस. पण्णीकरांच्या मते धर्मशास्त्राच्या लेखकांना पुराणांच्या प्राचीन पध्दतीचे ज्ञान होते. परंतु महाभारताचे जे रुप आमच्यासमोर येते ते गुरुकालीन आहे. पुराणांचे मोठमोठे संग्रह तयार झाले. या काळात यासंबंधी संशोधन व अभ्यास पण करण्यात आले. ही भारताची राष्ट्रीय परंपरा आहे. नीति, आचार व धर्माचा तद्वत राजकीय कर्तव्यासंबंधी हा एक मोठा कोषच म्हटला पाहिजे.

या दृष्टीने आदिपुराणाकडे बधितले तर अनेक प्राचीन तत्वे दृग्गोचर होतील. आदिपुराणासंबंधी दोन प्रकारे कथन करता येईल. द्रव्य, क्षेत्र, काल, तीर्थ, सत्पुरुष, त्यांचे आचरण यात वर्णिले आहे. उर्ध्व, मध्यम, पाताल यासंबंधी वर्णन म्हणजे क्षेत्र भूत, वर्तमान व भविष्य म्हणजेच काल. सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र्य म्हणजे तीर्थ. या तीर्थाचे सेवन करणारे म्हणजे शलाका पुरुष, पाप नष्ट करणारे. या पुरुषांचे न्यायोचित आचरण म्हणजे क्रिया. जिनसेनाचार्यांनी पुराणाची व्याख्या करताना खालील वण्ये विषयावर विशेष भर दिला आहे-

१) लोक २) देश ३) नगर ४) राज्य ५) तीर्थ ६) दान-तप ७) गति-चतुर्गति-सुखदु:खाचे कथन ८) फल-पुण्यपापाचे फलाबरोबर मोक्षप्राप्तीचे निरुपण.

जिनसेन आचार्यांनी वर्ण्य-विषयाचे प्रतिपादन करताना सांगितले की लोक-नाव, व्युत्पत्ति, प्रत्येक दिश, लांबी-रुंदी इत्यादींचे वर्णन करणे लोकाख्यान होय. लोकांच्या एका भागात असलेला देश, पहाड, द्वीप, समुद्र, इत्यादींचे विस्तारपुर्ण देशाख्यान होय. देशातील नगर व समृध्दीसंबंधी माहिती चित्रित करणे, नगराधिपतीचे वैभव, विलास, राज्यविस्तार व राज्यव्यवस्थेचे चित्रण करणे यास राजाख्यान म्हणतात. ज्यामुळे संसार तरुन जाता येईल. त्यास तीर्थ अशी संज्ञा आहे. तीर्थकराचे चरित्राचे वर्णन करणे म्हणजे तीर्थाख्यान. तप किंवा ज्ञानाचे महत्व सांगणारी कथा चित्रित करणे म्हणजे तप-दान कथा, नरकादि चार गतींच्या अनेक अवस्थांचे वर्णन करणे गत्वख्यान होय. जीवाच्या संसारापासून मोक्षापर्यन्तचे वर्णन करणे म्हणजे फलाख्यान होय. याप्रमाणे पुराणांचा विस्तार झालेला दिसतो.

जिनसेनांनी पुराणास सत्कथा म्हटले आहे. कथा सात प्रकारची आहे. द्रव्य, क्षेत्र, तीर्थ, काल, भाव, महाफल व प्रकृत या सात अंगांनी युक्त आहे.

जिनसेनांनी पुराणांची जी व्याख्या केली व वर्ण्य विषयांच्या निरुपणांच्या दृष्टीकोणातून असे निश्चित लक्षात येते की विष्णुपुराणादिकामध्ये 'पुराणपंचधा' म्हणून म्हटले आहे. सत्पुरुषाला जैन पुराणामध्ये शलाका पुरुष म्हणतात. यामध्ये विद्वत्तेचे प्रतीक ऋषिमुनींचे चरित्र व चक्रवर्ती व राजादिकांचे चरित्र सांगितले जाते. जेव्हा काल व क्षेत्राचा विचार केला जातो तेव्हां सृष्टीच्या प्रारंभापासून प्रलयापर्यन्तचे इतिवृत्त दिले जाते. धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांचे त्यात विवेचन असते.

आदिपुराणामध्ये प्राचीन पुराणतत्वे आढळून येतात. शलाका पुरुषांच्या कथा, आख्यान व त्यांचे परिवर्तन, समकालीन सामाजिक समस्यांचे उद्‌घाटन, पारिवारिक जीवन व संवाद-तत्व, धर्मसिध्दांत, कथन शैलीची रोचकता, अलंकृत शैली, लोकमूर्ति, लोक-परंपरा, शृंगार-रस मनोरंजनादि वर्णन.

**कथावस्तु-**

आदि पुराणाच्या कथेचे प्रधान नायक आदितीर्थकर ऋषभदेव व त्यांचे पुत्र भरत चक्रवर्ती हे आहेत. या दोन शलाका पुरुषांच्या जीवनाशी संबंध असणाऱ्या अनेक कथा वर्णिल्या आहेत. या महाग्रंथाची कथा ४७ पर्वामध्ये रचलेली आहे. पहिल्या दोन पर्वात वक्ता-श्रोता-लक्षण-पुराण श्रवणफल इत्यादींचे वर्णन आहे. शेवटचे कुलकर नाभिराजाच्या वेळी कल्पवृक्षाच्या सर्वत्र प्रकाश होता. कल्पवृक्षापासून सर्वांना यथेच्छ पदार्थ मिळत असत. परंतु कालांतराने कल्पवृक्ष नष्ट झाले. त्यामुळे प्रजेमध्ये व्याकुळता वाढली. सर्व लोक दु:खी होऊन नाभिराजाकडे जाऊन स्वास्थ्य-व्यवस्था करण्याविषयी विनवू लागले. नाभिराज चौदावे कुलकर होते. त्यांनीच धान्य, फळे, इक्षुरस इत्यादींचा उपयोग कसा करावा याचे ज्ञान दिले. यापुढे मातीचे भाडे करुन त्यात

स्वयंपाक कराव याची आवश्यकता सांगितली. प्रजा शांतीचे रहावी म्हणून न्याय-अवस्था सांगितली. चवथ्या पर्वात गांधील देश व अलकेचे वर्णन केले आहे. या नगरीचा राजा अतिबल विद्याधर व त्याच्या मनोहरा नांवाच्या राणीचे वर्णन यात केले आहे. आपल मुलगा महापाल यास विरक्तीनंतर राजा अतिबलाने राज्य दिले. महामति, संभिन्नमति, शतमति आणि स्वयंबुध्द हे त्याचे चार मंत्री हाते. त्याने राज्य कारभार सोपविला व तो स्वतः भोगोपचारामध्ये लीन झाला. पाचव्या पर्वात महाबलाची विरक्ती व सल्लेखनेचे वर्णन आहे. तो तपप्रभावाने इशान स्वर्गात ललितांग नांवाचा देव झाला. सहा महिने बाकी असतांना ललितंग दुःखी अवस्थेत होता. पंचणमोकार मंत्राचे स्मरण करीत स्वर्गाच आयुष्य पूर्ण करुन ललितंग पुष्कलावती देशातील उत्पलखेट नांवाच्या नगराचा राज वज्रबाहु झाला व त्याची पत्नी स्वयंप्रभा मृत्यू पावून पुण्डरीकिणी नगरीचे राजाच्या घरी श्रीमति नांवाची मुलगी झाली. श्रीमतीला पूर्वभवाचे स्मरण होते व ती ललितांगाच्या प्राप्तीसाठी वृत्तसंकल्प झाली.

सातव्या पर्वात ललितांगाचा जीव वज्रसंघ महापूत चैत्यालयात येतो व त्याच्या दृष्टीस तो चित्रपट येतो. पूर्वभवाचे स्मरण होऊन त्याचा जीव स्वयंप्रभेला प्राप्त करण्यासाठी अधीर होतो. पण्डिताचार्याला तो एक चित्रपट देतो. त्या दोघांचे पुन्हा मीलन होते.

आठव्या सर्गात वज्रसंघ व श्रीमतीच्या भोगोपभोगाचे वर्णन आहे. चारणमुनींना वज्रसंघ आहारदान देतो. ते मुनी त्याला पूर्वभव सांगतात. मुनींनी त्यास आठवे तीर्थकर होण्यासंबंधी व श्रीमतीला दानतीर्थ सुरु करणारे श्रेयांस होण्यासंबंधी भविष्यवाणी करतात. नवव्या सर्गात प्रारंभाला भोग-उपभोगांचे वर्णन आहे. पुढे संयोगवश सुगंधयुक्त खोलीत कोंडून राहिल्यामुळे दोघेहि मृत्यू पावले. पण सत्पात्रदानाच्या प्रभावाने ते उत्तरकुरुमध्ये आर्य-आर्या झाले. प्रीतिंकर मुनीश्रेष्ठाचे सान्निध्याने ते देव झाले. दहाव्या सर्गात प्रीतिकराच्या केवलज्ञानाचे वर्णन आहे. अकराव्या सर्गात वज्रनाभीचे वर्णन आहे. बाराव्या सर्गात अहमिंद्रचा जीवच ऋषभदेव म्हणून नाभिराज व मरुदेवीच्या घरी जन्माला आला. याच पर्वात मरुदेवीच्या गर्भावस्था व देवीच्या द्वारे केलेल्या सेवेच्या दृष्टीने वर्णन केले आहे. तेराव्या सर्गात आदि भगवंताच्या जन्माभिषेकाचे वर्णन केलेले आहे. चौदाव्या सर्गात इंद्राणीद्वारे मातेस बालक सोपविणे व त्याचे ऋषभदेव नांव ठेवण्याचे वर्णन केले आहे. पंधराव्यात ऋषभदेवाच्या शारिरीक सौंदर्याचे वर्णन केले आहे. सोळाव्या सर्गात भरत चक्रवर्तीच्या व बाहुबलीच्या जन्माचे वर्णन केले आहे. सतराव्यात ऋषभदेवांच विरक्तीचे वर्णन केले आहे. नीलांजना नर्तकी नृत्य करीत असताना एकदम अदृश्य झाली हे पाहून भगवान विरक्त झाले. भरतास राज्याभिषेक करुन सर्वांना योग्यतेप्रमाणे ते राज्य देतात. अठराव्या पर्वात ऋषभदेवांच्या तपांचे वर्णन आहे. एकोणिसाव्या पर्वात धरणेंद्राने नमि-विनमिला विजयार्ध पर्वताच्या नगरींचा परिचय करुन दिला. विसाव्यात तपश्यर्चेनंतर श्रेयांसच्या घरी घेतलेल्या आहाराचे वर्णन केले आहे. एकविसाच्य पर्वात ध्यानाचे, बाविसाव्यात ज्ञानप्राप्तीचे, तेविसाव्यात इंद्राद्वारे ऋषभदेवांची स्तुति व चोविसाव्या पर्वात भगवंताच्या दिव्य ध्वनीचे वर्णन केले आहे. अठावीस ते शेहेचाळीस सर्गापर्यत चक्रवर्तीचा विजय, दक्षिण दिशेकडील प्रयाण, दक्षिण विजय व पश्चिम दिश्‌कडे प्रयाण,

लवण समुद्रापर्यंत जय, उत्तर दिशेचे प्रयाण, नागजाती विजय, भरत चक्रवर्ती दिग्विजय, भरत-बाहुबली युध्दवण्ऱ्ान, क्रिय संस्कार वर्णन, राजनीति वर्णाश्रय वर्णन, जयकुमार-सुलोचना स्वयंवर, जयकुमार विरक्ती, चक्रवर्ती दीक्षाग्रहण, ऋषभदेवांचे कैलास पर्वतावर निर्वाण इत्यादि घटनासूत्र कथेत गुंफले आहे.

**आदिपुराण व समाजदर्शन-**

आदिपुराणाच्या निर्मितीचा विषय स्थूलरुपाने भगवान ऋषभदेव व भरत चक्रवर्ती हा जरी असला तरी त्यातून त्या वेळचा समाज व सामाजिक संस्थांचा इतिहास दृष्टीस पडतो. समाजाची निर्मिती मानव समूहाचे रक्षण व त्याचे आदर्श निश्चित करण्यासाठी होते. या निर्माण कार्यात मानवी आचार-व्यवहार व मानाचे स्थान प्राप्त करण्याची प्रवृत्ति ही कारण आहे.

**जैन स्तोत्र साहित्याचे आलोचनपर अध्ययन**

**( A critical Study of the Jain Stotra Literature)**

**ग्रंथाची पूर्वपीठिका-**

प्रस्तुत हा ग्रंथ हा जैन स्तोत्र साहित्याचे समग्ररुपाने अध्ययन करणार जैन साहित्यातील आद्य ग्रंथ आहे. जैन धर्मातील असंख्य प्रकाशित-अप्रकाशित व ताडपत्राने जिनमंदिरात विद्यमान असलेली अशी असंख्य स्तोत्रराशी, मौक्तिक मण्याप्रमाणे जैन वाडमयात इतस्ततः विखुरलेली आहेत. या स्तोत्रराशीतील कनिवय, मौलिक व उपयोगी असे स्तोत्र गीत आतापर्यंत कुठेच प्रकाशित झाले नाही असे नव्हे. मराठी भाषेत भक्तितरंग म्हणून अहमदाबादहून प्रसिध्द झालेल्य पुस्तकांचे संपादन व मराठी भाषांतर करणारे श्री. क्षीरसागर सर्वांच्या परिचयाचे आहेत. त्यांचा प्रयत्न काही लोकप्रिय स्तोत्रांचा परिचय देण्याइतका सीमित आहे. पं. पन्नालाल साहित्याचार्यांनी पण 'पंचस्तोत्र' म्हणून भक्तामरादि पाच स्तोत्रांचे प्रकाशन केले आहे. व जैन स्तोत्र साहित्यातील भक्तिरसाची प्रचीति करविण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. याशिवाय संग्रहात्मक पध्दतीचा अवलंब करणारी 'जिनवाणीसंग्रह' या संग्राहय ग्रंथात कनिवय स्तोत्रमालिका आलेली आहे. ज्यांचा उपयोग कोणताही जैनभक्त प्रतिदिवशी केल्यावाचून राहणार नाही.

जैन स्तोत्राचा उल्लेख कमीजास्त प्रमाणात पं. बलदेवशास्त्री यांच्या 'संस्कृत साहित्यका इतिहास', डॉ. विटरनिझ यांच्या History of Indian Literature, Vol. II, डॉ. किथ यांच्या History of Sanskrit Literature, डॉ. दासगुप्ता व डे यांच्या History of Sanskrit Literature, डॉ. शारलोटी क्रोझे यांच्या Ancient Jain Hymns या पुस्तकात स्थूलरुपाने आलेला आहे. पण जैन स्तोत्रांचा हा उल्लेख इतका त्रोटक व अपुरा आहे की त्यामुळे जैन साहित्यात केवळ भक्तामरादि प्रसिध्द काही स्तोत्राशिवाय स्तोत्रसंख्या नसावी व असलीच तर ती विविध विषयांचे निरुपण करणारी नसावी येथपर्यंत शंका यावी. केवळ काही स्तोत्रांची इतस्ततः उदाहरणे वापरल्याने अथांग स्तोत्र निर्मितीची व त्यातील विकासाची कल्पना येणे शक्य नाही. जैन स्तोत्र ही जैन साहित्यातील अखंडपणे ज्ञानप्रवाह जिच्यातून वाहतो अशी ज्ञानगंगा आहे असे म्हटले तर हा

निष्कर्ष काढावयास आम्हाला समग्र अध्ययन करुन त्याचे भारतीय साहित्यात काय स्थान हे दाखविणाऱ्या ग्रंथाची जरुरी आहे. प्रस्तुत प्रबंध ही आवश्यकता पूर्ण करण्यास समर्थ आहे. तद्वत जैनांचा इतिहास, धर्म, दर्शन, राजनीति, आचारसंहिता इत्यादि विषयांना अनुलक्षून केलेले सखोल अध्ययन प्रस्तुत करण्यास समर्थ आहे. ही आवश्यकता या ग्रंथाने पूर्ण होईल ही केवळ आमची आकांक्षा नसून ते आत्मविश्वास घेऊन जैन समाजातील सामान्य कोटीच्य जिनानुयायासही सदरहू ग्रंथ उपयोगी ठराव व सद्भावनेने याचे प्रकाशन होत आहे.

वास्तविक पाहता जैन स्तोत्रांचे सर्वांगीण अध्ययन व्हावे ही मनीषा जरी अनेक वर्षापासून असली तरी तिला चालना देण्यास कारणीभूत झालेले भूतपूर्व डायरेक्टर वैशाली विद्यापीठ व सध्या जबलपूर येथील संस्कृत, पाली व प्राकृत विभागाचे विद्यमान प्रमुख डॉ. हिरालाल जैन हेच आहेत. त्यांच्या उल्लेखाप्रमाणे जैन स्तोत्र हा सामान्य जनास रुचकर विषय असूनही आतापर्यंत त्याबाबतीत कोणीही सर्वांगीण अध्ययन केलेले नाही. या अध्ययनाने जैन साहित्याची अभिवृध्दी तर होईलच. तर त्याचबरोबर जैन काव्य रसिकासही काव्यानंद लुटण्याचे समाधान होऊन जैनांच्या सांस्कृतिक अध्ययनाचे श्रेय प्राप्त होणार आहे. त्यांचे शब्द हे आज्ञा म्हणून स्वीकारुन हा विषय पीएच. डी. च्या प्रबंधासाठी म्हणून तयार केला आहे. डॉ. ए. एन. उपाध्ये यांच्याशी ज्यावेळी या विषयासंबंधी 'सूतोवाच' केले त्यावेळी त्यांनीही आपल्या अमूल्य ग्रंथसंपत्तीतून पाश्यात्य विद्वानांनी स्तोत्र अध्ययनाची दालने कशी उघडली आहेत याचे विवरण केले. डॉ. शुब्रिंग नावाच्य विद्वानाने तर 'Jain Stotra Literature' म्हणून समग्र स्तोत्रांची साहित्यपुर्ण रचना दर्शवून भारतीय साहित्यात मोलाची भर घातली आहे. त्या संबंधीचा जर्मन भाषेमध्ये असलेल डॉ. ए. एन. उपाध्ये यांनी मला पुरविला त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

जैन स्तोत्र साहित्याची विशालता लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनात्मक निबंध (Ph. D. Thesis) सामान्यपणे १० प्रकरणामध्ये विभागला आहे.

**१. जैन स्तोत्र-स्वरुप क्षेत्र-**

जैनांच्या स्तोत्र निर्मितीची भूमिका विशद व्हावी हा या प्रकरणाचा उद्देश अनेक स्तोत्र साहित्यातील उध्दरणासह स्पष्ट केला आहे. भारतीय साहित्यातील स्तोत्र धारा अविच्छिन्नरुपाने सर्व धर्मामध्ये प्रवाहित झालेली आहे. पण जैन स्तोत्र हे अन्य धर्मीयाप्रमाणे ऐहिक, भौतिकवादी, मारण-तारणासाठी उपयोजिलेले नाही. मनःशांति, आत्मतुष्टि, बिनविरोध, पापमुक्ति, अष्टकर्महानि, निर्वाणप्राप्ती इत्यादि अनेक शब्दानी आयार्चांनी स्तुति करण्यामागची भूमिका स्पष्ट केली आहे. समंतभद्राने यास 'स्तुतिविद्या' म्हणून गौरविले आहे. जैन स्तोत्राचे क्षेत्रसुध्दा व्यापक आहे. केवळ गुणानुराग म्हणून स्तोत्राचा प्रयोग करणे हा केवळ स्तोत्रांच्या विस्तारातील एक भाग आहे. जेन स्तोत्रांचा प्रयोग, स्तव स्तवन, स्तुति या विविध रुपात होतो. बऱ्याचवेळा त्यास 'थव' किंवा 'थुई' या प्राकृत शब्दाने पण संबोंधिले जाते. जैन स्तोत्राची व्याप्ति पण मोठी

आहे. जैन स्तोत्र, जिनेंद्र भगवंताच्या दर्शन, पूजा, सामायिक, अभिषेक, जप, ध्यान, योग इत्यादि सर्व क्रियावर रचलेले असते. मुनीसाठी जे सामाजिक प्रतिक्रमण, स्तवन, वंदना, हया षट क्रिया सांगितल्या त्यात स्तोत्र हे प्रथम आहे.

२. **जैन स्तोत्रांचा विकास-**

हया प्रकरणात अगदी प्रारंभिक कालापासून ते ३१९ व्या शतकापर्यंत झालेल्या स्तोत्र रचनेचे अध्ययन केले आहे. ह्या प्रकरणात काळाचा, विषयाचा, शैलीचा व काव्यगुणांचा क्रमशः विकास कसा झाला हे सांगितले आहे. वास्तविक पाहता भगवान पार्श्वनाथाच्यावेळी जैन स्तोत्रांची निर्मिती झालेली आहे. पण त्याचा ऐतिहासिक उल्लेख इ. स. पूर्व ८०० च्या वेळी दिसत नाही. जैन स्तोत्रांचा आदि उल्लेख म्हणजे गौतम गणधरांने महावीर स्वामीच्या समवशरणात गेल्यानंतर भगवंताचे असामान्य दिव्य रुप दृष्टीस पडल्यावर केलेली स्तुती ही प्रथम स्तुती होय. प्रायः या स्तुतीला 'जयतिहूण' स्तोत्र पण म्हटले आहे. यानंतर अनेक गणधरांनी भगवंताच्या समवशरणाची स्तुती केली आहे. स्तोत्र रचनेच्या दृष्टीने भगवान भद्रबाहू व त्यांचे पुव्वसग्गहर स्तोत्र यासही इतिहासकारांनी अतिप्राचीन स्तोत्र म्हणून मान्यत दिली आहे. पण जेन स्तोत्राचा वास्तविक प्रारंभकाळ हा कुंदकुंदाचे दशभक्तीपासून म्हणजे इ. स.  पू. १ले शतक ते इ. स. २ रे शतक. हे स्तोत्र प्राकृत भाषेतील म्हणजे भाषेच्या दृष्टीने प्रथम प्राकृत काळ व इ. स. ३ शतकापासून संस्कृत रचनेस प्रारंभ झाला. इ. स. ३ शतकापासून ९ व्या शतकापर्यंत विविध ज्ञानपर तर्क शैलीच्या स्तोत्रांची निर्मिती हा जैन स्तोत्र वाडमयातील द्वितीय कालखंड होय व तृतीय कालखंड १० व्या शतकापासून म्हणजे जिनसेन आचार्यांपासून ते १९ व्या शतकातील महावीर स्तोत्र रचनेचे कर्ते भागचन्दापर्यन्त. अशाप्रकारे जैन स्तोत्र रचनेतील तीन कालखंड विभागले आहेत. भाषेच्या दृष्टीने प्राकृत, संस्कृत व अपभ्रंश असे विभाजन दिसून येते.

**३. जैन स्तोत्रातील विविधता-**

जैन स्तोत्र साहित्यामध्ये जैनाचार्यांनी केवळ एकाच विषयावर वेगवेगळया पध्दतीने स्तुति केली आहे. जिनेक भगवंताची स्तुति, जिनसामान्य स्तुति, विशेष जिनस्तुति, निःपक्ष जिनस्तुति, तर्कप्रधान जिनस्तुति, शतकपध्दति, सहस्त्रनाम स्तोत्र पध्दति, प्रत्येक तीर्थकर स्तुति, २४ तीर्थकर स्तुति, एकाच तीर्थकरावर अनेक स्तोत्र, अध्यात्मपर स्तोत्र, न्यायस्तुति, (दार्शनिक स्तुति), मंत्रालय स्तुति, घटनापर स्तोत्र इत्यादि अनेक पध्दतीच्या स्तोत्रांची विविधता दाखविलेली आहे.

४. जैन स्तोत्रातील देवता-

प्रत्येक धर्मामध्ये असंख्य देवता कल्पिल्या आहेत. पण जैन धर्मात खऱ्या अर्थाने देवतावाद नाही. डॉ. राधाकृष्णनसारख्या विद्वानाने तर स्पष्ट म्हटले आहे (Indian Philosophy Vol. P.) की जैन धर्मात जैन स्तोत्र व भक्ति नावाचा प्रकारच नाही, कारण जैन धर्म निरीश्वरवादी आहे. जैन ईश्वर मानीत नाहीत तरी पण त्यात केवळ गुणुनुरागमय स्तोत्र रचना आहे. जैन धर्मातील देवता म्हणजे गुणांची विविध स्थित्यंतरे होत. ती प्रत्येकाजवळ शक्तीरुपाने विद्यमान आहे. सामान्यपणे स्तुतीचे विषय पंचपरमेष्ठी, जिनेंद्र भगवान, २४ तीर्थकर, देव, गुरु व शास्त्र यांची स्तुती व याशिवाय जैन धर्मातील देवता, शासनदेवी, विद्यादेवी, (अंबिका, सरस्वती, ज्वालामालिनी, चक्रेश्वरी, इत्यादि) काही कन्नड देवांची क्षेत्रपाल इत्यादींची स्तुति दिसून येते.

ज्यांच्यासंबंधी स्तोत्र साहित्य उपलब्ध आहे त्या देवतांची स्वरुप व कार्य याविषयी जैनदृष्टिकोणातून वर्णन केले आहे.

५. जैन स्तोत्राचे रचयिता-

जैन स्तोत्रांची संख्या विशाल असल्यामुळे रचयिते आयार्यांची संख्या पण मोठी आहे. तरी ह्या प्रकरणात ज्यांनी जैन स्तोत्र साहित्यास नवीन वळण दिले व साहित्य समृध्द केले अशा ठळक आचार्यांचे जीवन व काव्यशैली, यावर प्रकाश टाकला आहे. भगवान, भद्रबाहू, कुंदकुंद, उमास्वामी, समंतभद्र, सिध्दसेन, पूज्यपाद, अकलंक, विद्यानंद, अमितगति, आशाधर, धर्मघोष, धनंजय, मानतुंग, वादिराज, भूपाल, धनपाल, शोभन, हेमचंद्राचार्य, पद्मनंदी इत्यादि ५० आचार्यांचा साहित्यिक परिचय दिलेला आहे. जैन स्तोत्रांची रचना करणारे सामान्य जन किंवा सामान्य जीवनातील व्यवहारी कवि नसून नि:स्वार्थी, ज्ञानध्यान, तपोनिष्ठ व आत्मदर्शी श्रेयार्थी, मुनिजन आहेत ही गोष्ट सहजासहजी लक्षात येण्यासारखी आहे. धनप्राप्ती, यशप्राप्ती व ऐहिक लाभ हे त्यांचे ध्येय नाही.

६. जैन स्तोत्रावर भक्तीचा प्रभाव-

जैन स्तोत्राचा भक्ति हा प्राण आहे. भक्ताचा भाव जेथे रंगला तेथे स्तुत्य व स्तोता हा फरक देखील शिल्लक रहात नाही. भक्तीमध्ये नम्रता, लीनता, लघुता, आत्मवेदना, कथनपरता, शरण्यवाद, आप्तसंबंध-प्रदर्शनरुपता इत्यादि रुपे लक्षात येतात. भक्ति ही बाह्य व आंतरिक, द्रव्यभक्ती व भावभक्ती, अष्टद्रव्यादि रुपाने बाह्यत: दिसून येणारी भक्ति, म्हणजे पूजा व भावभक्ती म्हणजे भावपूजा व गुणस्मरण. जैनस्तोत्र साहित्यातील भक्तामर, कल्याण मंदिर इत्यादि भक्तीपर रचना आहे. भक्त निरागस, अनासक्त, अपरिग्रही असल्यामुळे भक्तीत पण अष्ट प्रकार आढळून येतात. केवळ भक्तीला अनुलक्षुन दशभक्ती हे कुंदकुंदाचे व पूज्यपादाचे स्वतंत्र साहित्य आहे. भक्ती व श्रध्दा यांचा परस्पर संबंध दाखवून जिनभक्ती ही मोक्षलक्ष्मी कशी प्राप्त करुन देते आणि भक्ति व स्तोत्र हे अविच्छिन्न अंग कसे आहे हे पण दाखविले आहे. जैन स्तोत्रातील उत्कट भक्ति ही ऐहिक भोग तर प्राप्त करुन देतेच शिवाय अंतिम सिध्दपद पण प्राप्त करुन देते.

७. जैन स्तोत्रातील जैन सिध्दांत निरुपण-

जैन स्तोत्र केवळ भावगीत, गुणगीत किंवा जिनमहात्म्य दाखविते हे चुकीचे विधान अथवा अपसमज आहे. जैन स्तोत्रांचा खरा उपयोग जैन दर्शनाचे सोपया भाषेत विवेचन करणे, भेद-प्रभेद सांगणे, की जे सहजासहजी स्मृतीत राहू शकतील. या दृष्टीने कुंदकुंदाच्या ग्रंथात अध्यात्मवाद, समंतभद्र, सिध्दसेन, पूज्यपाद, अकलंकदेव, विद्यानंद, यांच्या स्तोत्रात जैनांचा प्रामाण्यवाद, ज्ञानवाद, कर्मतत्वज्ञान, अनेकांतवाद, स्याद्वाद याविषयी मार्मिक विवेचन केलेले आढळते. आप्तमीमांसा, आप्तपरीक्षा, पात्रकेसरी स्तोत्र इत्यादीतून सर्वज्ञसिध्दि मार्मिकतेने झाली आहे. समंतभद्राच्या स्वयंभू स्तोत्रात सर्व जैन सिध्दांत अनेक ठिकाणी स्तुतीव्याजाने मांडले आहेत. जैनांचा अहिंसावाद, अपरिग्रहवाद यांचे विवेचन देखील लक्षणीय आहे.

८. जैन स्तोत्रांचे साहित्यिक मूल्यांकन-

जैन स्तोत्र वाङमय हे विविध थरातील साहित्याचे दर्शन घडविते. त्यामुळे ते ज्वलंत व जिवंत आहे. जैन स्तोत्र-साहित्यातील कलापक्ष व भावपक्ष पूर्णपणे आविष्कृत आहे. त्यात प्रसाद, ओज, माधुर्य, काव्यगुण, शब्दालंकार, अर्थालंकार रसनिष्पत्ति, प्राधान्ये करुन शांत रसाची निर्मिती झालेली आहे. जैनस्तोत्र वाङमयातील चित्रणशैली विलोभनीय आहे. समंतभद्राने जिनशतक (चित्रालंकार), सिध्दसेनाची त्रिशदद्वात्रिशिका, पूज्यपादाचे सिध्दिप्रिय स्तोत्र, आदि यमक, अनुप्रास श्लाकादिक अलंकाराने पूर्ण आहेत. सर्वसामान्यपणे उपमा व दृष्टांत तसेच अलंकाराचे वैपुल्य सर्व ठिकाणी दिसून येते. काव्यमालेच्या सप्त गुच्छातील काव्यश्रेष्ठ स्तोत्रांचा या ठिकाणी उल्लेख केला आहे. काही स्तोत्रे सुंदर भाषेत आहेत. काही संस्कृत व प्राकृतमय आहेत. त्यांचाही भाषावैचित्र्य दर्शविण्याकरिता उल्लेख केला आहे. काही स्तोत्रात केवळ छंद ग्रथित केले आहेत. काहीत तीर्थक्षेत्रांची सर्व नांवे ग्रथित केली आहेत. सामान्यपणे जैन स्तोत्र-साहित्य गुण व शैली या दृष्टीने समृध्द आहे यात शंका नाही.

९. जैन स्तोत्राचे तुलनात्मक अध्ययन-

जैन, बौध्द, हिंदु या तीनही धमाच्या स्तोत्रांची तुलना करण्याची आवश्यकता विद्वानांनी प्रतिपादिली होती. म्हणून या प्रकरणात जैन व बौध्द, जैन-हिंदु या दोन पध्दतीत स्तोत्रांची निर्मिती, विषय, देवता, शैली

**इत्यादि विषय-सादृश्य आणि विसादृश्य याचे अध्ययन केलेले आहे. जैन-बौध्द स्तोत्रांच्या विषयात व विशेषतः गीते-आचारविषयक सिध्दांतातील सादृश प्रतिपादिले आहे. तसे पाहिले तर जैन प्राकृत भाषा समृध्द करणारे व बौध्द पाली भाषा समृध्द करणारे हिंदु-संस्कृत भाषा पुष्ट करणारे असल्यामुळे भाषिक फरक स्पष्ट होतो तरी, पण प्रत्येकाने संस्कृत भाषेत रचना केली आहे. हिंदु धर्म मात्र बहुदेवतावादी व अनेक पंथांचा जन्मदाता असल्यामुळे त्यातील स्तोत्ररचना अगदी विशाल व अधिक वैभवशाली आहे. जैन, बौध्द, हिंदुधर्माच्या तात्विक भूमिकेचे दर्शन त्यांच्या स्तोत्रात कसे घडत आहे याचे मार्मिक व रसग्रहणात्मक विवेचन यात आले आहे. उद्देशातील विसदृश्यता पण दाखविलेली आहे.**